१९१६
म. ग्रं. सं. ठाणें
विषय चरित्र
सं. क्र. २७६५

REFBK-0001269

सं. ठाणे
२०७६९

Man's Library--Volume IV.

# ONEY MAKING TEACHER.

द्रव्यप्राप्ति शिक्षक–पुष्प चवथें.

# हिंदुस्थानचा हिरा.

कै० नामदार गोपाळराव कृष्ण गोखले,
सी. आय. ई.

१२६९

लेखक व प्रकाशक,
श्रीरंग लाडकोबा देसाई.
[illegible] मुंबई म्यानिसिपालिटी.

REFBK-0001269

पुस्तकाचें पुनःप्रकाशन, भाषांतर वगैरे संबंधीं सर्व हक्क कर्त्यानें
राखून ठेविले आहेत.

किं. २ आणे.

**द्रव्य** प्राप्ति-शिक्षक "धी सेल्फ मनी मेकिंग टीचर" भाग ४ तयार आहेत. प्रत्येक २ आणे. २ रा व ४ था भाग ४ आणे.

मनी मेकिंग ट्रेनिंग सप्लाय असोसिएशन,
मुंबई नंबर ८.

---

**चहा** आणि कॉफीची जंगी वखार.

निलगिरी "दरबार" चहा कॉफीचे १/४ ते ९ रतली डबे व पुडे सीलोन, कलकत्ता वगैरे चहाच्या (आखा व भुकीच्या) ४९ ते १०९ रतली पेट्या मागवा.

पर्ल आणि कंपनी, राणीचा बाग-मुंबई.

---

**प्रतिज्ञा** आह्मीं मुंबईत कांहीं इस्टेटींचे एजंट असून, शिवाय इतर बंगले व इस्टेटी विकणें, विकत घेणें, गहाण ठेवणें, अगर भाड्यानें देणेंसंबंधीं सर्व कामें पुष्कळ वर्षांच्या अनुभवानें फारच कसोशीनें करितों. ही प्रतिज्ञा.

इस्टेटी विकत घेणारीं व गहाण ठेवणारीं गिऱ्हाइकें आमचेकडे आहेत.

कारोनेशन हाऊस एजन्सी, राणीचा बाग-मुंबई.

# हिंदुस्थानचा हिरा.

## कै० नामदार गोपाळराव कृष्ण गोखले,

सी. आय. ई.


लेखक व प्रकाशक,

**श्रीरंग लाडकोबा देसाई.**

इन्स्पेक्टर, मुंबई म्युनिसिपालिटी.



मुंबई.

सन १९१६.

तापावर

# एग्युपील्स

५० गोळ्या किं. ८ आणे.

---

वायु, संधिवात, डोकें दुखण्यावर

# म्याजिक बाम

किंमत ६ आणे.

---

खोकल्यावर

# चाटण

किंमत ८ आणे.

---

नायकांच्या तांबड्या व पांढऱ्या धुपणीवर

# प्रदरान्तक

किंमत १ रुपया.

पर्ल आणि कंपनी, राणीचा बाग, मुंबई.

# प्रस्तावना.

देशाची उर्जितावस्था येण्याकरितां सर्व लोकांना शिक्षण मिळून, त्याची मानसिक, शारिरीक व धार्मिक बाबतींत उन्नति व्हावी, व देशांत हजारों उद्योग धंदे निर्माण करून त्यांना असें वाटावें कीं आपण आत्मप्रयत्नानें सर्व देशाच्या उन्नतीस हातभार लावित आहोंत; हें जें कै. नामदार गोखले यांचें ध्येय त्याचा सर्वत्र प्रसार व्हावा, त्यांचें स्मरण आह्मांस सदैव घडावें, त्यांचें उदाहरण डोळ्यांपुढें राहावें. साधेपणा, सात्विक वृत्ति, उद्योगाची चिकाटी, सत्याची चाड, परमेश्वरावर पूर्ण भाव व भावी कालाविषयीं सदाशा इत्यादि अनेक स्पृहणीय गुणांनीं मंडित अशा त्यांच्या चरित्रानें आह्मांस स्फूर्ति चढावी हेंच त्यांचें पिढ्यानपिढी टिकणारें व इतर कोणत्याहि स्मारकापेक्षां मूल्यवान् असें स्मारक होय. करितां अशा सत्पुरुषाचें चरित्र यथामति लिहून तें फुकट वांटून स्वदेश बांधवांची अल्प तरी सेवा करावी, असेंच पहिल्यानें मनानें घेतलें. परंतु परिस्थितीचा विचार करितां तें काम बऱ्याच मोठ्या खर्चाचें दिसल्यामुळें सांपत्तिक स्थितीच्या अभावीं माझ्याकडून पार पडणें शक्य दिसेना म्हणून तो बेत रहित करून थोड्या किंमतींत कार्य संपविण्याचें ठरविणें भाग पडलें; व त्यांतल्या त्यांत थोडी बहुत रकम शिल्लक राहिल्यास तिचा विनिमय आपल्या चरित्र नायकाच्या उद्देशाप्रमाणें प्राथमिक शिक्षणाप्रीत्यर्थ करावा असें ठरलें; तरी लहानापासून थोरांपर्यंत सर्वांनीं हें चरित्र नेहमीं आपल्या नजरे समोर ठेवून आपल्याहि आंगीं त्यांचे अलौकिक गुण आणण्याची खटपट करावी अशी सप्रेम विनंती आहे.

—लेखक—

सर्व प्रकारचे तापावर

# एग्युमिक्श्चर

किं. १० आणे.

---

उलटी, झाडा, अतिसार, संग्रहणी व पटकीवर

# नास्टीन

किंमत ६ आणे.

---

# नारूवर

तीन दिवसांत हटकून गुण किंमत १ रुपया.

---

# गजकरण मलम

आग होत नाहीं व डाग पडत नाहीं. २४ तासांत गुण किं. २ व ४ आणे.

गांवोंगांवीं एजन्ट पाहिजेत.

व्यापाऱ्यांस भरपूर कमीशन. क्याटलॉग मागवा.

पर्ले आणि कंपनी, राणीचा बाग, मुंबई.

# हिंदुस्थानचा हिरा.

## कै० नामदार गोपाळराव कृष्ण गोखले. सी. आय. ई.

**॥ पुत्र व्हावा ऐसा गुंडा, ज्याचा तिहीं लोकीं झेंडा ॥**

तुकाराम.

प्रत्येक मनुष्य ( स्त्री किंवा पुरुष ) " सद्वर्तनी व दीर्घोद्योगी " असावा अशीच ईश्वरी इच्छा आहे व ती देणगी त्यानें सर्वांना जन्मतःच दिलेली आहे. हें मी " ईश्वरी देणगी " या पुस्तकांत सांगितलेंच आहे. परंतु तिचा योग्य उपयोग करून आपल्याला सहजिक पछाडणारे व आपली स्थिती लाजिरवाणी करणारे " आळस व दुर्वर्तन " यांना लुब्ध न होतां व त्यांच्या पगड्यांत पडून त्यांना बळी न पडतां आपली कीर्ति दिगंतरीं अजरामर करून ठेवणारे सुपुत्र या मन्वंतरांत फार थोडेच निपजतात. असे लोक ज्या ज्या देशांत जन्माला येतात त्या त्या देशांत तत्कालिन प्रचलित असणाऱ्या सामाजिक, धार्मिक व राजकीय परिस्थितींतच उत्पन्न होत असतात. परंतु पुढें अधिकाधिक कर्तव्य-दक्ष होऊन दिवसेंदिवस कसे कर्तबगार बनतात व त्याच परिस्थितीला योग्य वळण लावून इतरांचीही तिकडे प्रवृत्ती होण्यास कशी जागृती उत्पन्न करितात हें त्यांच्या चरित्रांच्या परिशीलनानें बरोबर समजून येणारें आहे. अशा विभूतीं पैकीं तंतोतंत दिव्य उदाहरण व हिंदुस्थानांतील एक प्रमुख मोहरा म्हटला म्हणजे आपले परमपूज्य लोकमान्य व राजमान्य नामदार गोपाळराव गोखले हे होत.

अशा थोर पुरुषांनीं इच्छिलेल्या कोणत्याहि कामांत यश, सुख, कीर्ति व संपत्ति हीं जणूं काय त्यांच्यासमोर हात जोडूनच उभीं असतात; आणि तीं त्यांच्या अंकित होऊन, त्यांच्या गळ्यांत माळ घालण्याकरितां व त्यांना आपलेसे करून घेण्याकरितां प्रत्येकीं आपापल्यापरि चढाओढ करित असतात. शिवाय सन्मान हा तर त्यांचा केवळ ताबेदार गुलाम बनलेला असतो ते ज्या ज्या देशांत किंवा लोकांत जातील त्या त्या ठिकाणीं तो त्यांच्या पुढें दत्त म्हणून उभाच असतो. म्हणजे कोणी

त्यांच्या गाडीचे घोडे सोडून आपणच गाडी ओढून त्यांची मिरवणूक शहरांतील मोठ्या-मोठ्या रस्त्यांनीं काढून पुष्पवृष्टि करितात, तर कोणी त्यांस मानपत्र देण्याकरितां मोठ्या-मोठ्या सभा भरवितात, तर कोणी त्यांच्या सन्मानार्थ मोठी मेजवानी करितात. ह्या आणि अशा रीतीनें नाना प्रकारांनीं लोक त्यांच्या बद्दलची आपली पूज्य बुद्धि व निस्सीम प्रेम व्यक्त करितात. ह्या प्रेमोद्भवाचें कारण काय ? हे महात्मे कधीं आपला मानमरातब अशा रीतीनें ठेवा असें सांगत असतात काय ? कीं, लोकांच्याच मनांत त्यांच्याविषयीं आपोआप पूज्यबुद्धि उत्पन्न होऊन ते इतका खटाटोप करून आपलें सर्वस्व इष्ट कार्यास अर्पितात ? ह्याचा विचार करा. बरें; समजा कीं, हे सर्व उत्साह ज्यांच्याकरितां होतात तेच जर " आळशी व दुर्वर्तनी " निपजले असते तर त्यांचा गौरव अशा रीतीनें कोणी केला असता काय ? नाहीं, तर मग ह्या महिमा केवळ त्यांनीं आपल्याला वाहून घेतलेल्या " सद्वर्तन व दीर्घोद्योग " यांचाच होय; हेच त्यांचे पंचप्राण, हें प्रत्येकानें ध्यानीं, मनीं, व स्वप्नींही वागविलें पाहिजे. ह्यांचाच जे अवलंब करतील तेच लोकमान्य होऊन वरील योग्यता मिळण्यास पात्र होतील, हें लक्षांत ठेवूनच प्रत्येकानें आपला वर्तनक्रम चालवावा. मात्र हेंहि लक्षांत असावें कीं, आपल्या नजरेसमोर नेहमीं एकच ( अधिक नव्हे ) उच्च ध्येय ठेवून तें मिळविण्याकरितां आत्मविश्वासानें अविश्रांत श्रम केले तरच आपणास ऊर्जितावस्था येईल व प्रसंगविशेषीं आपल्या कल्पनेच्या बाहेर जरी मेहनत करावी लागली तरी न डगमगतां " प्रयत्नांतीं परमेश्वर " हें वाक्य ध्यानांत ठेवून यत्न चिकाटीनेंच चालविला पाहिजे.

काम करीत राहणें हा तर मनुष्याचा स्वभावच बनून गेला पाहिजे. लहान मुलांस अभ्यासाशिवाय व मोठ्या माणसांस अभ्यास व सत्कार्याशिवाय जो क्षण इतर क्षुल्लक बाबींत गेला तो फुकट गेला अशी मनास तळमळ लागली पाहिजे. अशा अभ्यासी व उद्योगी माणसांस विश्रांति तर अत्यावश्यक आहे; मात्र ती जरूर तितकाच वेळ घेतली पाहिजे. विश्रांतीनें पुनः उद्योग करण्यास नवी हुशारी व उत्तेजन येतें पण तीच जरूरीपेक्षां अधिक घेतल्यास तितका वेळ फुकट जातो हें विसरतां कामा नये.

जसजशी जास्त मेहनत होत जाईल तसतसा अधिकाधिक अनुभव येऊन व प्रगती होऊन मनुष्य स्वकार्यांत पारंगत होईल, दृष्टि आकुंचित न राहतां तिचा पल्ला लांबवर

होईल, औदार्यबुद्धि वाढून विचार विकास पावतील, मनाचें दौर्बल्य जाऊन धैर्य येईल, विविध कलांविषयीं सहानुभूति व आदर वाटून उत्तेजन येईल, अंधश्रद्धेचे दास व रूढीचे गुलाम न बनतां कोणच्याहि कलेंत प्राविण्य संपादून तिची समृद्धि करतां येईल; निर-निराळ्या प्रकारच्या विद्या, कला, संस्कृति, सुधारणा, शोध वगैरे देशाच्या कीर्तीसाठीं व जगाच्या सौख्यासाठीं पुढें आणतां येतील, अशा रीतीनें अनेक प्रकारच्या उदात्त विचारांनीं मन सदोदित प्रफुल्लित राहून काम करीत राहण्यांतच मनुष्याला खऱ्या आनंदाची प्राप्ती होते याची साक्ष पटेल व आपलें, आपल्या कुटुंबाचें, आपल्या देश बांधवांचें, आपल्या राष्ट्राचें इतकेंच नव्हे तर सर्व जगाचेंही कल्याण करण्याचें सामर्थ्य ईश्वर आपणास देईल. राजापासून तों रंकापर्यंत मनुष्य-प्राणीच असा आहे कीं त्याला त्याच्या आयुष्यक्रमांत अधिकउण्या अडचणी किंवा बरेवाईट प्रसंग हे यावयाचेच. परंतु कर्तव्यपराङ्मुख न होतां व तें करीत राहणें ही प्रचंड जबाबदारी आपणा प्रत्येकावर आहे हें न विसरतां कर्तव्य निश्चयी झालें पाहिजे; व तें करितांना जरी कष्ट सोसावे लागले तरी त्यांनीं खचून न जातां जास्त उत्साही व आशावादी बनलें पाहिजे. सारांश, लौकिकदृष्ट्या आपल्यास कोणतीही स्थिती प्राप्त झाली असली तरी त्यांतल्यात्यांत ईश्वरानें जें आपणास मानवी जीवित दिलें आहे त्याचें आपल्या सदसद्विवेकानें व समाधानवृत्तीनें आपणास योग्य सार्थक करतां येईल, याची विचारणा प्रत्येक स्त्रीपुरुषानें नेहमीं करीत असलें पाहिजे. अशा रीतीनें अनेक बाजूंनीं आपलें कर्तव्यकरण्यास कायावाचामनेंकरून अहर्निश झटलें तरच आपली सुधारणा व जीवित साफल्य होऊन तद्वारा एकंदर समाज अथवा राष्ट्र यांचीही उन्नति होऊन, तीं आधिभौतिकच केवळ नव्हे तर अध्यात्मिक वैभवाच्याही सुखद व भूषणास्पद शिखरावर जाऊन विराजमान होतील.

अशाच तऱ्हेनें योग्य कर्तव्य बजावणारे आमचे नामदार यांचें चरित्र ह्मणजे अनेक मूल्यवान् गुणांचा सुंदर मेळ व उत्तम तत्वांचा एक मूर्तिमंत पुतळाच असून नित्य-मननास योग्य ग्रंथच होय. हें नेहमीं सर्वांच्या नजरे समोर राहून त्यांनीं त्यांचे गुण आपलेसे करून घेण्याची खटपट करावी ह्मणून मी लिहित आहें. परंतु माझ्या अल्पमती-मुळें व त्यांच्या आयुष्यक्रमाच्या इत्थंभूत माहितीच्या अभावीं हे कार्य माझ्या सारख्या

यःकश्चित मनुष्याकडून पार पडणें शक्य नाहीं, तरी सूज्ञ वाचक त्यांतील गुणदोषांबद्दल क्षमा करितील अशी सप्रेम विनंती करितों.

गोपाळरावांचा जन्म कोंकणांत चिपळूण तालुक्यांत कोतळूक नांवाच्या एका खेडेगांवीं ओकांच्या घरीं ह्मणजे त्यांच्या आईच्या माहेरीं तारीख ९ माहे मे सन १८६६ रोजीं झाला. त्यावेळीं हा गुलाबाचा कळा पुढें टवटवून आपल्या दर्शनानें व सुगंधानें दशादिशा मोहून टाकील अशी अस्पष्ट कल्पनाही कोणाला शिवली नसेल. पुढें त्यांच्या मातुःश्री दोन महिने माहेरीं राहून नंतर मुलाला घेऊन ताम्रनमळयास ( हा गांव चिपळूण तालुक्यांतच कोतळूक पासून सुमारें आठ मैलांवर आहे. ) आपल्या गांवीं गेल्या व तेथेंहि चार पांच महिने राहून मग कागलास आल्या.

गोपाळरावांचे वडील कृष्णराव हे कागलास कारकुनीच्या नोकरींवर होते. पैशांच्या दृष्टीनें कृष्णरावांच्या वडिलांची स्थिती तितकी अनुकूल नव्हती, शिवाय कृष्णरावांची मातोश्री ते चार महिन्याचे असतांनाच निवर्तली ह्मणून वडिलांनीं द्वितीय संबंध केला. या संबंधापासूनहि त्यांना दोन मुलगे झाले. पहिले जयरामपंत व दुसरे माधवराव; अर्थात अलीकडील मानवी नियमाप्रमाणें वडिलांचा ओढा साहजिक दुसऱ्या संबंधाच्या मुलांकडे विशेष असल्यामुळें प्रथम कुटुंबापासून झालेले कृष्णराव व त्यांचे वडील बंधु अंताजीपंत याच्याबद्दल घरांत वरीच हयगय होत असे. केव्हां केव्हां त्यांना बराच त्रासही सोसावा लागे. ( द्वितीय संबंधानें पुरुष, व सवती मत्सरानें बायका, आंधळ्या होऊन प्रथम संबंधाच्या मुलांची स्थिती कशी शोचनीय करितात याची कल्पना वाचकांनींच करावी ) परंतु दुःखांत सुख एवढेंच कीं हे दोघे बंधु आईविणें पोरके झाले होते ह्मणून म्हणा किंवा सध्यांचें भाऊबंदकीचें वारें त्यांच्या अंगांत शिरलें नव्हतें म्हणून ह्मणा, शेवटपर्यंत एकत्र एका विचारानें व प्रेमानें वागत असत. असा हा बंधुप्रेमाचा मासला इतरांनींही पोटभर चाखल्यास अजीर्ण खास होणार नाहीं.

कृष्णरावांचा स्वभाव जरा हूड, धाडसी, बाणेदार परंतु तापट असे; त्यामुळें लहानपणीं त्यांना गांवांतील मंडळी " वाघोबा " या टोपण नांवानें हाक मारित असत. पुढें ताम्रनमळ्यास शिक्षणाची सोय नसल्यामुळें ते कोल्हापुरास त्यांचे चुलते मामलेदार होते त्यांच्याकडे शिक्षणासाठीं गेले. तेव्हांपासून ते ताम्रनमळ्यास फारसे येत नसत. बरोबरच

आहे, मुलांचें आद्यदैवत ( लहानपणींच मात्र; मोठेपणीं आद्यदैवत बदलतें ) जी माता ती अकालिक मृत्यूनें नेल्यामुळें ताम्हनमळ्यास त्यांचें बालपणचे लाड पुरवणारें कोणी नव्हतें ह्मणूनच त्यांचा घराकडील ओढा कमी झाला असावा.

आमच्या चरित्रनायकाचें गुरुस्थान ज्यांच्याकडे जावयाचें होतें ते भावी गुरु कै. न्यायमूर्ति रानडे व पितृत्व ज्यांच्याकडे गेलें होतें ते कृष्णराव हे कोल्हापुरास एकाच शाळेंत, एकाच वर्गांत, एकाच शिक्षकाच्या हाताखालीं व एकत्र शिकत असत, हा ईश्वरी कृतीचा योगायोग आज किती विलक्षण दिसतो बरें? ही जुळवाजुळव किती कौतुकार्ह आहे? असे प्रसंग आपल्या पाहण्यांत फार थोडेच येतात. ह्यांत ईश्वरी सूत्रें एकमेकांशीं परस्पर कशीं बांधलीं गेलीं होतीं याची कल्पना तरी कोणास त्यावेळीं होती काय? शिवाय स्वतः रानडे किंवा कृष्णराव गोखले या सहाध्यायांच्या स्वप्नींतरी हा पुढील योगायोग आला असेल काय? म्हणूनच हा कर्मधर्मसंयोग आतां मोठ्या गमतीचा वाटतो. ( तो गमतीचा कां वाटतो याचा संबंध पुढें येईल. )

माधवराव रानड्यांचे वडील कोल्हापुरच्या राजाचे खासगी कारभारी होते. शिवाय माधवराव स्वतः पराकाष्ठेचे अभ्यासी व तीव्र बुद्धिचे असल्यामुळें त्यांच्या अभ्यासास खंड न पडतां तो तसाच चालू राहिला व कृष्णराव तितके अभ्यासी नसल्यामुळें व खर्चाची ओढाताण म्हणून त्यांना लौकरच नोकरी धरावी लागली; चुलत्याच्या वशिल्यानें त्यांना कागलास कारकुनीची जागाही मिळाली.

कृष्णरावांची बायको म्हणजे गोपाळरावांची आई श्रीमती सत्यभामाबाई ही एक साध्वीच होती. व स्वभावानें गरीब, सहनशील, कष्टाळु, सत्वनिष्ठ, धार्मिक व मनाची थोर होती. आपणास कितीहि त्रास झाला तरी दुसऱ्यांना संतापून किंवा टाकून बोलणें, अंगावर कितीही काम पडलें तरी चुकवाचुकव न करतां तें निमुटपणें करणें, कोणी, पई पाहुणा आला तर तोंड वाकडें न करतां त्याचा आदरसत्कार मनःपूर्वक करणें, सर्वांशीं प्रीतीनें वागणें, दुसऱ्याचें उणें किंवा अपराध पोटांत घालणें इत्यादि गुणांची केवळ खाण होती.

सत्यभामाबाई केव्हां केव्हां थोडे दिवस घरीं ताम्हनमळ्यास जात असत व तिकडूनच माहेरच्या माणसांनाही भेटून येत असत परंतु त्यांची सावत्र सासू आपल्यांतील कित्येक

कजाग सास्वांप्रमाणें आपल्या सासूपणाच्या तोऱ्याचा वचपा तितक्याच अवधींत मिरवून घेत असे. जणूं काय तो तिला पुढें आपल्या पोटच्या मुलांच्या बायकांवर मिरवतांच येणार नव्हता ! ( तेंहि खरें, कारण कित्येक मुलें वयांत आल्याबरोबर व बायको आद्यदेवता कबज्यांत मिळाल्यानंतर आई बापांस जुमानिनातशीं होतात. ) परंतु सत्यभामाबाई कधीं आपल्या सासूचा अपमान करीत नसत; किंवा चकारशब्दानें उलट बोलत नसत. नाहीं पेक्षां आजकालच्या बऱ्याचशा बायका मागचा पुढचा विचार न करितां नवऱ्याला थोडिशी नोकरी मिळाल्याबरोबर शेफारून जाऊन त्यांना दोनच बोटें स्वर्ग राहिल्यामुळें कोणाची पर्वा करीत नाहींत.

कृष्णराव जरा तापट स्वभावाचे, चिडखोर व मानी असल्यामुळें कधीं कधीं कांहीं कमजास्त किंवा मनासारखें न झाल्यास लागलेच वर्दळीला येत परंतु सत्यभामाबाई कधीं रागानें एक शब्द बोललेल्या कोणाला आठवत नाहीं. इतकी त्यांची पतिनिष्ठा व पतीबद्दल पूज्यभाव होता व कृष्णरावही आपल्या कुटुंबाच्या शांत व समाधानवृत्तिची व टापटिपीची कधीं कधीं तारीफ करीत आणि आपल्याला अशी गृहलक्ष्मी मिळाल्याबद्दल वारंवार आनंद मानित. कदाचित् असेंहि नसेल कशावरून कीं अशी पतिव्रता स्त्री पुढें दिगंतरीं अजरामर किर्ति पसरणारा सुपुत्र प्रसवणार ही गर्भित प्रेरणा ईश्वरानें कृष्णरावाच्या अंगीं उत्पन्न केली नसेल ? आणि त्या भावी आनंदाचा थोडासासुद्धां मासला त्यांच्या अल्पायुष्यामुळें मिळणार नव्हता म्हणून ते आनंदाचे घुटके अगोदरच घेत ? कसेंही असो, इतकें खरें कीं स्त्री-सुख झणून ज्याला झणतात तें इतर पुष्कळांच्या जरी नशिबीं नसलें तरी कृष्णरावांना होतें हें खास.

संसारांत मनुष्याला जर पत्निसुख नीट नसेल तर मग तो ऐहिक सुखांना मुकलाच झणायचा. त्याप्रमाणें जर पतिराज दुर्गुणी असतील तर सौभाग्य चिन्ह असून वैधव्यापेक्षां तीव्रतर यातना त्या बिचाऱ्या, सुशील भार्येला भोगण्याशिवाय गत्यंतरच नसतें.

गोपाळराव व त्यांचे वडीलबंधु गोविंदराव कागलास मराठी शाळेंत जात असत, पुढें त्यांचा मराठी अभ्यास पुरा झाल्यावर त्या दोघांनाहि कोल्हापुरास इंग्रजी शाळेंत ठेविलें; त्यावेळीं गोपाळरावांचें वय १० दहा वर्षांचें होतें, ते लहानपणापासूनच तरतरीत बुद्धिचे

असत व त्यांचा स्वभावहि करारी, बाणेदार, शांत, मनमिळाऊ व प्रेमळ असे. आपल्या आईबापांची स्थिती गरिबीची असल्यामुळें आपल्या वडिलांस आपल्या दोघांचा अभ्यास व कुटुंबसंरक्षणासाठीं होणारी ओढाताण व भोगावा लागणारा त्रास पाहून त्यांना फार वाईट वाटे व आईबापासही मुलांचें प्रेमळ वर्तन पाहून फार आनंद होई, परंतु गोविंदरावांचें लक्ष अभ्यासाकडे फारसें नसे ह्मणून वडिलांना जरा विषाद वाटे.

गोपाळराव कधीं आईबापाच्या आज्ञेबाहेर जात नसत, व सकाळींच लवकर उठून स्नान व वडिल माणसांस नमस्कार वगैरे नित्याचा विधी आटपून अभ्यास अगदीं मन लावून करीत. नित्यनेमानें शाळेंत वेळेवर जात असत व आपल्या वर्गबंधूंशीं कधीं उद्धटपणाचें वर्तन करीत नसत, किंवा कोणाची कागाळी शिक्षकास सांगत नसत. इतर मुलांप्रमाणें यांचें खेळाकडे किंवा खोड्या व कलागती करण्याकडे लक्ष नसे. ते स्वतःचें हित व अनहित कशांत आहे हें समजत. अपशब्द किंवा हलकी भाषा त्यांच्या मुखावाटे कधींच निघत नसे. ते सर्वांशीं मोकळ्या मनानें वागत ह्मणून कोणास अप्रिय नसत. शिक्षकांसहि त्यांना कधीं शिक्षा करण्याचा प्रसंग येत नसे. इतका ते अभ्यास काळजीनें करीत आणि ह्मणूनच त्यांना प्रिय असत. अभ्यासांत शिक्षकाकडून दूषण लावून घेणें हा त्यांस मोठा अपमान वाटे. फुरसतीच्या वेळीं मोठमोठ्यांचीं चरित्रें वाचण्याची त्यांना विशेष आवड असे, ते बहुतकरून कादंबऱ्या, नाटकें वगैरे वाचीत नसत.

अशा रीतीनें त्यांचा इंग्रजी शाळेंतील अभ्यास अर्धा मुर्धा होत आहे तोंच या दोघां मुलांवर दुर्दैवाचा घाला पडला, त्यांच्या वडिलांना चाळिशी उलटण्याच्या आंतच मधुमेहाचा, विकार जडला होता व मधुमेहांतच पुढें बहुमूत्राचा विकार होऊन वयाच्या बेचाळीसाव्या वर्षींच ह्मणजे सन १८७९ सालीं त्यांचा अंत झाला. अशावेळीं सत्यभामाबाईची काय स्थिती झाली असेल बरें? याचा विचार वाचकांनींच करावा. तिच्यावर तर आकाशच कोसळलें. साधारण गरीबीच्या स्थितीच्या कुटुंबावर कर्त्यापुरुषाचा मृत्यु म्हणजे एक आकस्मिक व प्रचंड घालाच म्हटला पाहिजे. ह्या दोन मुलांशिवाय त्याना आणखी चार लहान मुली होत्या. अशा सहा मुलांचें संगोपन ती बिचारी माऊली आतां कसें करणार ?

कृष्णरावांचें व वडिलबंधूचें एकमेकांवर अति प्रेम होतें. त्यामुळें अंताजीपंतांनाहीं आपल्या प्रियबंधूचें निधन असह्य झालें. परंतु त्यांनीं आपला शोक आवरून व ईश्वरावर हवाला ठेवून पुढील मार्ग आक्रमिला; त्यांचीही गरीबी असल्यामुळें ते कसेबसे कोकणांत घर संभाळून होते तरी त्यांनीं सत्यभामाबाई व मुली यांना आपल्या घरीं नेलें. वग-वशिला लावून कृष्णरावांच्या मागें त्यांचा वडील मुलगा गोविंदराव यांना कागलकरांकडून १५ रुपयांच्या कारकुनीची नोकरी लावून दिली व गोपाळरावांची शिकण्याची सोय कोल्हापुरास केली. कारण होतकरू मुलगा अभ्यासाशिवाय ठेविला तर त्याचें सर्व आयुष्य निरर्थक जाईल; असें त्यांना वाटत होतें व गोपाळरावहि अभ्यास सोडून घरीं राहण्यास खुषी नव्हते. त्यांच्या मातोश्री तर गोपाळरावांचा अभ्यास पुढें चालू राहण्याचा संभव नाहिंसें वाटून अगदीं हताश झाल्या होत्या. परंतु गोपाळरावांनीं आईचें नानाप्रकारें शांतवन करून सांगितलें कीं वेळ पडल्यास मधुकरी मागून किंवा वार लावून झालें तरी अभ्यास करणार असाच माझा निश्चय आहे करितां तूं माझ्या अभ्यासाबद्दल कांहींएक काळजी करूं नको. इतक्या लहान वयांत अभ्यासाबद्दल किती दृढ निश्चय हा ? इतका निश्चय असणें कांहीं सामान्य गोष्ट नव्हे. कित्येक खुशालचेंडु विद्यार्थ्यांप्रमाणें अभ्यास न करितां त्यांनीं वेळ घालविला असता तर त्यांचेंहि आयुष्य कसेंबसें तरी गेले नसतें काय ? ख्यालीखुशालींत फुकट वेळ घालविणाऱ्या विद्यार्थ्यांना कर्तव्यजागृति होण्यास अशा तऱ्हेचीं उदाहरणें त्यांच्यासमोर असणें म्हणजे एक अमूल्य ईश्वरी देणगीच समजली पाहिजे. मात्र ते तिचा योग्य उपयोग करितील तर ?

एकमेकांवर प्रेम ठेविल्यास एकीचीं बंधनें कशीं जखडलीं जातात अर्थात प्रेमामुळें एकी किती दृढतर होते व तिचा प्रसंगीं कसा उपयोग होतो हें यावरून ध्यानांत ठेवण्यासारखें आहे. कारण प्रसंग हा कोणास सांगून येत नाहीं, तो केव्हां आणि कशा रीतीनें आकस्मिक येईल त्याचा कांहीं नेम नाहीं व अशा वेळीं प्रीतीच्या माणसांशिवाय कोणी कोणाच्या उपयोगी पडत नाहीं. करितां स्वतंत्रताप्रिय तरुणी तरुणांना त्यापासून पुष्कळच बोध घेण्यासारखा आहे.

एकीपासून कसकसे फायदे आहेत ह्याची खरी कल्पना बहुतेकांस नसावीसें दिसतें म्हणूनच तिचें महत्त्व त्यांना वाटत नाहीं. तसें असतें तर घरोघरीं फाटाफुटीचा सुळसुळाट

आजकाल इतका माजला नसता. ही फाटाफूट सकृद्दर्शनीं फार मोहक दिसत असल्यामुळें तिच्या बेगडी स्वरूपास भुलणाऱ्यांचें लक्ष तिच्या दुःखपर्यवसायी शेवटाकडे जात नाहीं. ह्याला मूळ कारण आंगीं असलेला अभिमान व त्याला स्वार्थबुद्धीची हळुहळु मिळणारी जोड. प्रथम एकमेकांविषयीं परस्परांच्या मनांत मत्सर उत्पन्न होतो; आणि कलहाला सुरवात होते. मग काय विचारतां ? ह्या राक्षसरूपी आगलाव्या मत्सरी कलह काय काय करणार नाहीं ? तो लहान थोर, गरीब श्रीमंत, प्रवुद्ध अप्रबुद्ध, स्त्री अथवा पुरुष कांहींच पहात नाहीं. त्याला काय ? कोणीही असो तो ज्या ज्या व्यक्तींत रीघला त्या त्या ठिकाणीं दुसऱ्या बद्दलचें प्रेम अथवा पूज्यभाव—मग तो कीतीहि असो—एकदम नाहींसा करून फाटाफुट व दुहीला सुरवात करितो. ह्याचें कारण दुसरें कांहींच नसून अशा वेळीं मनुष्य अगदीं विकारवश बनतो आणि सारासार विचारांना फाटा देतो; बेकीमुळें प्रत्येक वेळीं व प्रत्येक ठिकाणीं कसकशा अडचणी व दुःखें उत्पन्न होतात आणि आपलें जीवित किती कष्टमय होतें व एकीमुळें कसा सर्वत्र आनंदी आनंद असतो याचा मनः-पूर्वक, आस्थेनें व सांगोपांग विचार केला असतां प्रत्येकाला समजून येणारें आहे, ह्याचा विचार दुसऱ्या ठिकाणीं किंवा दुसऱ्याजवळ न जातां ज्यानें त्यानें ईश्वरानें दिलेल्या आपल्या स्वतःच्या शरीररचनेवरूनच ईश्वरीसंकेत काय असावा याचा अंतःकरणपूर्वक विचार केल्यास कल्पना होऊं शकते. ती अशी कीं, ईश्वरानें प्राणीमात्रांची उत्पत्ती कर-तांना अवयवांची रचना अशी केली आहे कीं, एकाचें काम दुसऱ्याकडून होत नाहीं तें नाहींच; पण एक दुसऱ्याबरोबर एकीनें राहणार नाहीं किंवा दुसऱ्याकरितां मेहनत घेणार नाहीं असें ह्मणेल तर दुसऱ्यालाही अडचण होऊन स्वतःवरही त्याचे अनिष्ट परिणाम होतात. उदाहरणार्थ पाय जर ह्मणूं लागले कीं आह्मीं हातांकरितां काम करणार नाहीं आणि हात ह्मणूं लागले कीं आह्मी पोटाकरितां काम करणार नाहीं तर त्याचा परिणाम काय होईल याचा विचार करा ह्मणजे समजून येईल कीं, पोट शुष्क राहिल्यानें हाता पायांच्या काड्या होऊन सर्वांच्या नाड्या आंखडल्या जातील व अस्थिपंजर होऊन त्या सर्वांचा नाश होईल. हीच स्थिती एकी नसलेल्या कुटुंबाची, गावांची अथवा देशाची होय. मग ते लहान असोत, वा मोठे असोत ज्या ठिकाणीं एकी ( प्रेम ) नाहीं, त्या ठिकाणीं प्रेम ( भक्ति ) नाहीं, ज्या ठिकाणीं भक्ति ( ईश्वर ) नाहीं, त्या ठिकाणीं ईश्वरी संकेत तरी कोठून असणार ?

बरें ! ईश्वरानें भरपुर अवयव देऊनहीं प्राणी मात्राला उत्पन्न केलें असलें तरी तो मोठा होईपर्यंत त्याचें संगोपन करण्यास कोणीतरी पाहिजेतच आहेत अर्थात त्यांच्यांतही प्रेम असेल तरच एकीची भावना उत्पन्न होणार आणि हें प्रेम आईबापांमध्यें विशेष असल्यामुळें त्यांच्याकडूनच चांगलें संगोपन होतें; परंतु आईबाप तरी एकटे संगोपन करूं शकतात काय ? भाऊबंद, चाकर नोकर वगैरे घरांतील व बाहेरील इतर मंडळीला सुद्धां जो मधून मधून हातभार लावावा लागतो तो तरी एकी असल्याशिवाय कोणी लावील काय ? तसेंच पुढें लग्न झालें तरी आपली व आपल्या पत्नीचीही एकीच असावी लागते, बेकी असल्यास सर्वच फजिती; तिची व आपली एकी असली म्हणजे झालें असें म्हणून तरी कोठें भागतें ? आपण दोघेंच एकटीं असलों तर अजार वगैरे अडचणीच्या प्रसंगीं आपल्याला शेजाऱ्यापाजाऱ्याच्या मदतीचीहि जरूरी लागते, मग ते कोणत्याहि जातीचे वा देशांतील असोत त्यांच्या बरोबर बेकी असल्यास ते ढुंकून सुद्धां पाहत नाहींत व एकी असल्यास वाटेल ती मदत करितात. एकंदरींत एकीच सर्वत्रांना व सर्व ठिकाणीं आवश्यक आहे आणि तीच सुख व आनंदाचें खरें साधन होय. प्रत्येक प्राणीमात्र आजन्म दुसऱ्या कोणावर तरी अवलंबून राहिला पाहिजे त्या शिवाय तो जिवंत राहूं शकत नाहीं अशीच ईश्वरनिर्मित व्यवस्था दिसते. मग ईश्वरीसंकेत तरी दुसरा काय असणार ? आणि त्या विरूद्ध वागणाराचें तरी कल्याण कसें होणार ?

सर्व जगांत अत्यंत उदात्त हिंदुधर्म परंतु अनवस्थेनें, दुर्बोधतेनें व भ्रामक कल्पनांनीं आज चहूंकडे हिंणावला जात आहे. तूर्त काळ बदलला आहे व धर्मतत्वें जितकीं सुबोध व व्यापक असतील तितकीं पाहिजे आहेत. धर्मतत्व एक व आचरणांत धर्म भिन्न, असा प्रकार झाल्यामुळें धर्मबंधनें शिथिल झालीं, धर्माचा उपहास झाला, भलत्याच गोष्टीला साधारण जनसमूह धर्म असें गणूं लागला व एकमेकांना कमी मानूं लागल्यामुळें परस्परांना मदत करणें तर राहिलेंच परंतु उलट द्वेषभाव वाढला. समाजांत एकमेकांच्या मदतीवाचून अडतें याचा अनुभव नित्यशः येत असतां, कोणाचा जीव चालला तरी कोणी कोणास मदत करण्यास न धजणें, जगांतील सर्व व्यवहार एक दुसऱ्याच्या मदतीवरच चालत असतात हें प्रत्यक्ष दिसत असून परस्परांच्या अनुभवाचा फायदा घेण्यास तयार नसणें, जो तो परस्परांविषयीं साशंक असल्यामुळें विश्वासाचा लोप होऊन संघशक्ति पार नष्ट

होणें, ही वस्तुस्थिति आतां बदललीच पाहिजे. आपणांला आतां उदार मन केलें पाहिजे, पुष्कळ जड जाईल, तरी पण धीरानें अनेक आघात सोसून इष्ट ध्येय जी एकी तिच्याकडे धांव घेतली पाहिजे. करितां आपणांत एकी होण्यास अडथळा आणणारे विरोधी विचार, शब्द व आचार यांचा नायनाट केल्यास एकी सहज होऊन सर्वांचें कल्याण होईल; आज अशी स्थिति आली आहे कीं या वेळीं आपणांतील भेदाभेदांस यत्किंतही थारा देतां उपयोगी नाहीं. बेकी ही केव्हांही झाली तरी अनिष्टच होय. आपसांतील भाऊबंदकीनें कोणाचें कल्याण झालें आहे ?

आपल्या लोकांमध्यें विवाहाच्या वेळीं वधुवरांचें कुल आणि शील ह्याकडे दोन्ही पक्षांकडील वडील माणसें फार लक्ष देतात. ह्याचें कारण त्या दंपत्याला संसारांत सुख व्हावें, हें तर असतेंच परंतु त्यापेक्षां त्याच्यापासून होणारी पुढील संतती अथवा भावी पिढीहि चांगली निपजावी हा त्यांत मुख्य हेतू असतो. कारण अशीं निपजलेली मुलें बहुतकरून मातृ किंवा पितृ वंशावर जातात म्हणजे आईच्या किंवा बापाच्या घराण्याचे किंवा दोन्ही घरांण्याचे थोडथोडे, विशेषतः आईबापाचे गुण संततींत उतरतात. म्हणून आईबापांना सच्छील व सदृढ होण्याची विशेष खबरदारी घेतली पाहिजे, असें केल्यानें स्वतःचें हित होऊन भावी पिढीही जास्त चांगली निपजते.

आमच्या गोपाळरावांतही पित्याच्या गुणाचा थोडासा प्रादुर्भाव होत होता. परंतु मातुल वंशाचे, विशेषतः आईचे गुणच त्यांच्या आंगीं विशेष होते आणि हेच त्यांच्या पुढील दिग्विजयाला जास्त कारण झाले; मोठमोठ्या पुरुषांचीं चरित्रें शोधन करणारांस बहुतेक असेंच आढळून येईल कीं अशा महंतांना प्रसवणाऱ्या आया साध्वीच होत्या आणि ह्यावरून असें स्पष्ट लक्षांत येईल कीं स्त्रियांचे आंगीं साध्वीचे गुण असणें म्हणजे बहुतेक उत्तम रत्नें प्रसवणें होय. हें स्त्रीवर्ग लक्षांत ठेविल काय ?

गोपाळरावांच्या आईला लिहितां वाचतां कांहीं येत नव्हतें तरी त्यांची स्मरणशक्ति फारच विलक्षण असे. त्यांनीं लहानपणीं आपल्या माहेरीं ऐकलेल्या साधुसंतांच्या व साध्वी स्त्रियांच्या बोधपर गोष्टी त्या आपल्या लेकरांना वारंवार निरनिराळ्या व बिनचूक

सांगत असत. जणूं काय त्या गोष्टी ऐकून आपल्या मुलांपैकीं एखादें मूल त्या योग्यतेला चढेल अशी भावना ईश्वरानें त्यांच्यांत अगोदरच उत्पन्न केलेली होती.

गोपाळरावांची पाठशक्तिहि विशेष वाखाणण्यालायक होती, ते मराठी चवथ्या इयत्तेत असतांना एक विशेष गोष्ट घडली. माहेरीं असतांना त्यांच्या आईनें प्रख्यात शिल्पी, कवि व मोडी लिपीचे उत्पत्तिकर्ते हेमाडपंत यांचीं कांहीं बोधामृत वचनें ऐकिलीं होतीं, तीं तिला फारच आवडत होतीं ह्मणून तिनें एकदा माहेरीं गेल्यावेळीं तीं आठवणीनें आणून गोपाळरावांस वाचावयास सांगितलीं. वाचनविषयही त्यांचा चांगला असल्यामुळें त्यांनीं तीं खणखणीत वाचलेलीं पाहून त्यांच्या मातोश्रीला फार संतोष वाटला आणि त्या आनंदाच्या भरांत तिनें आपल्या लाडक्यास पोटाशीं धरून कुरवाळलें आणि ह्मणाली, बाळ, तीं तुला कशी काय आवडलीं ? ते ह्मणाले तीं फारच उत्तम आहेत; परंतु थोडींशीं मला समजलीं नाहींत तरी मी तीं दादांना ( वडीलांना ते दादा म्हणत ) विचारीन अगर तुला समजत असल्यास विचारतों.

लहान मुलें बहुतकरून स्वभावतःच शोधक बुद्धिचीं असतात आणि कांहीं ना कांहीं सृष्टींतील अनेक चमत्कार पाहून हें काय ? तें काय ? ह्मणून विचारूं लागतात; याचा अनुभव बहुतेकांस आहेच. परंतु त्यांना त्यावेळीं बरोबर समजेल अशा बोधप्रद रीतीनें समजावून सांगणेंच फार चांगलें असतें, कारण त्यामुळें त्यांची उत्सुकता दिवसें दिवस जास्ती वृद्धिंगत होते. त्यांनीं विचारलेल्या प्रश्नांचीं समर्पक उत्तरें मिळालीं नाहींत तर त्यांच्या जिज्ञासा बुद्धिची वाढ होण्यास वाव मिळत नाहीं आणि जिज्ञासा पूर्ण झाली नाहीं ह्मणजे ती वाढण्याच्या ऐवजीं खुरटूं लागते. गोपाळरावही फार शोधकबुद्धिचे असत. त्यांनीं थोड्या वेळांत तीं सर्व वचनें आईस तोंडपाठ ह्मणून दाखविलीं व त्यांतील आपणांस न समजणाऱ्या शब्दांचा अर्थही विचारिला. परंतु ती तरी शिक्षणाच्या अभावीं काय समजावून सांगणार ? शिवाय ती भाषाही फार जुनी ( ६००–७०० शें वर्षांपूर्वीची ) असल्यामुळें कांहीं शब्द अगदीं अपरिचित होते, त्यांचा अर्थच तिच्या लक्षांत येईना. आपण थोडें तरी शिकलों असतों तर आपल्या बाळाची जिज्ञासा पुरी करितां आली असती ह्मणून तिला वाईट वाटलें; आणि ती ह्मणाली आह्मां बायकांचें

नुसतें चुली पुरतें शहाणपण, मला थोडें तरी शिकविलें असतें तर मी रिकाम्या वेळांत भीमा, गंगु, अंबु व द्वारका ( हीं त्यांच्या मुलींचीं नांवें ) यांना शिकविलें असतें. परंतु इलाज काय ? तरीपण तिकडून येणें झाल्यावर आतांच्या प्रमाणेंच पाठ ह्मणून दाखीव ह्मणजे तुला शाबासकीही मिळेल व अर्थहि विचार ह्मणजे समजावून देणेंहि होईल.

संध्याकाळीं वडील कामावरून घरीं आल्यानंतर तीं वचनें पाठ ह्मणून दाखविलेलीं पाहून त्यांनीं गोपाळरावाचें फार कौतुक केलें व तीं त्यांस समजावून सांगितलीं व त्याप्रमाणें लहानपणापासून वर्तणुक ठेविल्यास मनुष्य कसकसे कर्तबगार निपजतात याची साक्षपटवून देण्याकारितां दोन मोठ्या माणसांच्या गोष्टीही सांगितल्या. पितृप्रेमच तें, मग काय विचारतां ? त्यांनीं प्रत्येक वाक्य समजावून देण्यांत आपली केवळ शिकस्त केली आणि सांगितलें कीं, हीं वचनें तूं आपल्या समोर ठेवून आपण कुठें कुठें चुकतों हें विचारपूर्वक लक्षांत आणून चुकीची दुरुस्ती करीत जा, ह्मणजे तूंही तसा मोठा माणूस होशील.

## " श्रीसकल गुण कलाप्रवीण हरिभक्तिपरायण

राजमान्य राजश्री हेमाडपंत ह्यांनीं, संसारी असतां प्रपंच परमार्थसिद्ध होय. अशी वर्तणुक कोणें प्रकारें करावी अशी नीति सर्वांस उपयोगी पडे अशी सांगितली जेः— बहुत पुण्य करून दैवगतीनें पाप पुण्य समान होतां नरदेहाची प्राप्ति, त्याहिमध्यें ब्राह्मण जन्म साधलियास सार्थकता करावी. तें गुरुकृपेविना होणें नाहीं ह्मणून सद्गुरुचरण धरावे. गुरुकृपा जाहलियावर प्रथम धुळाक्षरें, गुणाकार, भागाकार, तेरजा, बेरजा, कर्दन, बस्तान, वरावर्दी, जमाखर्च, मसुदे करूं शकावें. कांहीं पाठांतर, गायन, सुभाषित, शास्त्र, वेद अवगत असों द्यावे. अनुकूल जाहलियासी पारसी शिकावी. समयास कार्यास पडेल. पुरवण्याही नानाप्रकारच्या लिहूं शकाव्या. कर्ममार्ग ध्यानास आणावा. गुरुकृपें साधन जाहलियास संत समागम चांगला धरावा. अनेक भाषा शिकाव्या. नाना तर्क अवगत असों द्यावे. अत्यंत विनोद कोणाशीं न करावा. वस्त्रें सोज्वळ असों द्यावीं. आपले कुलस्वामीची सेवा एकनिष्ठपणें करावी. स्नान, संध्या, देवतार्चन, जप करितां चित्त स्वस्थ असों द्यावें. ह्मणजे परमेश्वर कृपा करील. प्राक्तनानुसार वैभव प्राप्त होईल. पुरुषानें हरहुन्नर शिकावें. भल्याशीं नम्रता

धरावी. संतांशीं शरण असावें. ग्रंथ, पुस्तकें पाहावीं. संग्रह करावा. थोरांशीं कार्यावेगळें भाषण नसावें. व्रत, नेम चालवित असावें. मातापितरांची मर्यादा बहुत ठेवीत जावी. आपले आप्तवर्ग वडील असतील ते पितृस्थानीं मानावे. हास्य कार्याविना नसावें काम, क्रोध, लोभ नेमस्त असावा. अतीत, अभ्यागत, सर्वांभूती दया असों द्यावी. समयास मान देत जावा. सुखीं दुःखीं सावध राहावें. द्रव्य संग्रह मिळाल्यास करावा. धर्मवासना असों द्यावी. नीच, भले ओळखावे. अभिमान न धरावा. आपली स्तुति व दुसऱ्याची निंदा न करावी. वावगें भाषण न बोलावें. ईश्वर नामाचा नीजध्यास अंतरीं असों द्यावा. कार्यो कारण, कार्य प्रयोजनीं उदारत्व धरावें. फड संपादावा. परस्त्री मातेसमान मानावी. परद्रव्य मलवत् मानावें. सहसा अभिलाष न करावा. ज्ञानीं चित्त ठेवावें. अज्ञानत्व दूर करावें. परोपकार करीत असावा. धान्य संग्रह करीत असावा, सर्व होईल. ज्याची सेवा करावी त्यास रजावत राखावें. जमाखर्ची सावध राहावें. अभ्यास करतां सर्व अर्थ होतील. प्रपंचीं सावधता असों द्यावी. ईश्वर भजन करावें. आप्तजनांचा सांभाळ करावा. प्रपंचीं असतां न्याय पहावा. सारासार विचार करीत जावा. अन्याय पाहिल्यास कोणाचा मुलाजा न धरावा. परनिष्ट असावें. दुसऱ्याची बुद्धि कार्याकारण घ्यावी. मतलब पाहून परिक्षा असावी. कोणाचा घात न करावा. सदोदीत आनंदरुप असावें. क्षमा असावी. उत्तम होईल तो मार्ग धरावा. ईश्वरें सामर्थ्य दिल्यास कोणास न छळावें. दूर दृष्टि असों द्यावी. काळ सारखा चालणार नाहीं. सर्वांभूतीं ईश्वर असें जाणोन कोणाचा मनोभंग न करावा. व दुसऱ्याचें वाईट करून आपलें बरें व्हावें ही वासना न करावी. पाहिल्यावांचून कोणावर आळ न घालावा. परिणामीं श्रम होईल असें न करावें. सर्वांशीं लीनता धरावी. उद्दाम बोलणें नसावें. शिष्टांचे सभेस नित्य बसत गेल्यास शिष्टपणा येईल, संशय नाहीं. राजसभेस खरें बोलावें; तेणें करून पार पडेल. नित्य जाग्रत असावें. कोणाशीं कठीण न बोलावें. मधुर भाषण करावें. प्रवासीं जवळ धनसंग्रह ठेवीत जावा, त्याची वाणवस्त असावी. जे वेळेस जसें मिळेल तसें गोड म्हणावें. दुर्जना जवळ चित्तांतलें कार्यकारण असेल तें न बोलावें. व्यवहार संबंधीं खरेपणीं दुसऱ्याशीं पत राखावी. ऋण करूं नये, केलें असतां परत उवकर करावें. लिगाडांत पडूं नये. अशा मार्गानें वर्तणूक करितां ईश्वर

पांडुरंग संकटीं पडूं देणार नाहीं. ही बुद्धि हेमाडपंतीं सांगितली. सर्व लोकांनीं जीवीं धरावी. वाट सोडून आड वाटेनें न चालावें. अशी विद्या असलियास दुसऱ्यास सांगावी. आपले सज्जन भक्त असतील ते सुखी राखावे. कोणा एकास दुःख न द्यावें. संसार नीतिनें केल्यास ह्यांतच प्रपंचपरमार्थ होऊन अंतीं सुखद फल होतें. कुग्राम वसती नसावी. कार्या विना कोणाचे घरीं न जावें. उत्तम असलियास जावें. पात्र पाहून दान प्रतिग्रह करावा. अन्नदानीं पात्रापात्र विचार न करितां जो घेईल त्यास द्यावें, संशय न धरावा. ”

माता पितरांचें योग्य वळण व शिक्षण मिळाल्यास मुलें बहुतेक चांगलींच निपजतात गोपाळराव व गोविंदराव या दोघां भावांमध्यें परकेपणा कधींहि नव्हता. हें परंपरागत बंधुप्रेमाचें बीज–अंताजीपंत व कृष्णराव या जोडीचें उदाहरण, या दोघांच्या डोळ्यांपुढें पहिल्या पासूनच होतें. गांवच्या खोतींत त्यांचा सारा एक पैशाचा हिस्सा असल्यामुळें अंताजीपंतांना गृहप्रपंच्याचा गरिबीनें झाला तरी खर्च भागवून गोपाळरावांस शिक्षणासाठीं पैसा पाठविण्याची शक्ति नव्हती, अर्थात गोपाळरावांच्या शिक्षणाचा सर्वभार गोविंदरावांवर–गोपाळरावांच्या “ अण्णा ” वर पडला आणि त्यांनींहि तो मनःपूर्वक व मोठ्या उत्साहानें उचलला. त्यांचें स्वतःचें लक्ष शिकण्याकडे फारसें नव्हतें हें मागें सांगितलेंच आहे, तरीपण वडील जिवंत असते तर त्यांचाहि थोडथोडा अभ्यास चालूच राहिला असता परंतु विधिघटनेपुढें मानवजातीचा काय पाड ?

साधारण स्थितींत परंतु आनंदानें दिवस कंठणाऱ्या या लहानशा कुटुंबांतून इतका गहजब करणाऱ्या धाडशी, निष्ठुर व बिनचुक दरवडेखोर मृत्यूनें त्यांच्या वडिलांना अकालीं नेल्यामुळें गोविंदरावांना नोकरी पत्करण्याशिवाय गत्यंतरच नव्हतें. शिवाय त्यांच्या ठिकाणीं बंधुप्रेमामुळें वसणारी गोपाळरावां बद्दलची आदरबुद्धि व सदिच्छा हींच त्यांना गोपाळरावांच्या शिक्षणाचा भार उचलावयास लावीत होती. आपल्याकडून होत नसला तरी आपला गोपाळा झटून अभ्यास करणारा आहे, त्याला शिकण्याची हौस आहे, शिक्षकाची त्याच्यांवर मर्जी आहे, तो होतकरू आहे वगैरे ते जाणून होते ह्मणून आपलें नाहीं झालें तरी गोपाळाचें शिक्षण त्याच्या मनाप्रमाणें पुरें करावयाचें हा त्यांनीं आपल्या मनाचा दृढनिश्चय केला होता.

वडिलांच्या निधनसमयीं गोपाळरावांचें वय अवघें तेरा १३ व गोविंदरावांचें १८ अठरावर्षांचें—पोरवयच होतें. परंतु गोविंदराव एखाद्या भागुबाईप्रमाणें दुःख करीत न बसतां आपल्या आनुवंशीक करारी व बाणेदार स्वभावाप्रमाणें कर्तव्यनिष्ठ बनले व प्रेमानें, प्रसंगानें व दृढनिश्चयानें त्यांच्या आंगीं एखाद्या पोक्त व अनुभविक मनुष्यापेक्षांहि अधिक उत्साह उत्पन्न झाला. त्यांना अवघे १५ पंधरा रुपये महिना मिळत तेवढ्यांत ते आपला खर्च भागवून गोपाळरावांना महिना आठ रुपये पाठवित. गोपाळरावांची विद्या होईपर्यंत त्यांचें स्वतःच्या सुखाकडे अगदीं दुर्लक्ष असे. त्यांचें ध्येय केवळ गोपाळा आणि त्याची अभ्यासाची सोय हेंच असे. इतके भावासाठीं झीज सोसणारे आजकाल किती भाऊ मिळतील बरें ? मनुष्य प्रसंगानें पेचांत सांपडला तरी प्रेमामुळें दृढनिश्चयी होऊन प्रसंगाशीं दोन हात करून त्यांतून कसा पार पडतो याचें हें तंतोतंत उदाहरण आहे. परंतु मुळाशीं प्रेम असेल तर ! तेंच सर्वांचें जीवन होय. व तें नसेल तर कांहींच होणें शक्य नाहीं.

आपल्यांत एक सर्व श्रुत ह्मण आहे, परंतु तिचें कोणाला विशेष महत्व वाटत नाहीं. ती ही कीं, " वेळेवर मेळ आणि शिमग्यावर खेळ " अशा ह्या आणीबाणीच्या व चमत्कारिक वेळावर आमच्या गोपाळरावांचे "अण्णा" जर एखाद्या रडतरावाप्रमाणें रडत बसून नोकरी धरण्याचा खेळ खेळले नसते तर गोपाळरावांना अभ्यास सोडून घरीं राहावें लागलें असतें आणि ते घरीं राहिले असते तर त्यांच्या हातून जी मोठी कामगिरी होऊन हिंदुस्थानावर अनंत उपकार झाले ते झाले नसते. कोणतीहि गोष्ट वेळेवर करण्यांत किती विलक्षण महत्त्व असतें याची खरी कल्पना त्यावेळीं होत नसते व असे प्रसंग प्रत्येक मनुष्यास त्याच्या आयुष्यांत कित्येक वेळांतरी येत असून फुकट दवडले जातात. कारण ज्यांना वेळाचीच किंमत नाहीं त्यांना त्याची योग्यता तरी कशी समजणार ? त्यांची प्रवृत्ती केवळ प्रेय ( आवडेल तें ) करण्याकडेसच असते, श्रेय ( श्रेयस्कर ) करण्याकडे नसते, मग आपल्या कृतींत व वर्तनांत प्रेय काय व श्रेय काय हें समजून घेण्याची तरी पर्वा कोण करितो ? तसे आमचे गोविंदराव नव्हते ते आपल्या वडिलांच्या मागें श्रेय तेंच करण्याबद्दल विशेष मेहनत घेत असत.

गोपाळरावांच्या हातून पुढें मोठमोठीं कामें व्हावयाचीं आहेत. याची अंधुक कल्पना जरी—"अण्णांना"—त्यावेळीं शिवली नसली तरी त्यांनीं ती वेळ भ्रातृप्रेमामुळें कां होईना

जशी आणि जितकी योग्य रीतीनें साधली पाहिजे होती तशी आणि तितकी साधली. ती वेळ तशी साधण्यानें त्यांनीं गोपाळरावांवर तर अनंत उपकार करून ठेविलेच परंतु हिंदुस्थानावरहि मोठे उपकार केले. " अण्णा " या प्रमाणें स्वतःला झालें तरी त्रासांत पाडून आपल्याला शिकावयाला पैसे पाठवितात, याची गोपाळरावांना जाणीव असे; ईश्वरानें आपणास गरिबीमध्यें ठेविलें तें ठेविलेंच आणि आपल्या शिरावरचें छत्रहि अचानक हिरावून नेल्यामुळें आपल्या अण्णावर अल्पवयांतच , आपल्या शिक्षणाचा भार पडतो ह्याची त्यांना वारंवार खंती वाटे आणि आपला खर्च ८ रुप-यांवर जाऊं न देण्याबद्दल ते फार जपत असत. खर्चाच्या टंचाईमुळें खाणाव-ळींत पैसे जास्ती लागतात ह्मणून ह्यातांनीं जेवण करतांना व मुनिसीपल कमिटीच्या कंदिलाशीं अभ्यास करितांना कित्येक वेळां त्यांना लोकांनीं पाहिलें होतें. इतकी एक निष्ठेनें सेवा व प्रखर तपश्चर्या करणारास जर विद्यादेवी प्रसन्न होणार नाहीं, तर मग होणार तरी कोणास ? आळसानें इतर निरर्थक गोष्टींत वेळ घालविणाऱ्या नामधारी विद्यार्थ्यांस काय ? त्यांच्यापासून तर ती बिचारी लांबच राहते. ती जर आपल्या भक्तां शिवाय इतरांकडे ढुंकून सुद्धां पाहत नाहीं तर मग प्रसन्न तरी कशी होणार ? देव जसा आपल्या भक्तांचा दासानुदास बनतो तशीच विद्यादेवी ही आपल्या भक्ताची केवळ ताबेदार बनते.

त्यांचे विद्यार्थीदशेंतले दिवस जरी अशा गरिबीच्या कडक शाळेंत जात असत तरी मागें न हटतां अभ्यास करण्याच्या कामांत ते आपली शिकस्त करीत. वेळ म्हणून फुकट दवडीत नसत. अशा उत्कट प्रेमानें अभ्यास करीत म्हणूनच ते पुढें इतके नांवालौकि-कास चढले. कारण विद्यार्थीदशेंत विद्यार्थ्यांचें जें कर्तव्य तें ते उत्कृष्ट रितीनें करीत, त्यांत हलगर्जीपणा कधींच करीत नसत.

ही गोष्ट ध्यानांत धरून इतर विद्यार्थी लक्ष देऊन जर आपलें कर्तव्य करितील तर त्यांचीहि कीर्ति ना. गोखल्यांप्रमाणें दिगंतरीं पसरेल. परंतु तेच जर अभ्यास न करतां गप्पागोष्टी करण्यांत, सीनेमा व नाटकें पाहण्यांत, चहा, कॉफी व कोल्ड्रिंक ढोसण्यांत, सिगारेटस् व चिरुटस् फुंकण्यांत आणि अशा रीतीनें नाना तऱ्हांनीं चैन करण्यांत वेळ घालवूं लागले तर वडिलांनीं स्वार्थत्याग करून, कधीं कधीं स्वतःच्या पोटालाही चिमटा

घेऊन, आपल्या सुखाला झुगारून, कित्येक वेळां अवश्य वस्तूंनाही चाट देऊन, अशा मुलांच्या अभ्यासासाठीं पैसा खर्च करण्यांत तरी अर्थ काय? अशानें मुलांचा स्वार्थ आणि परमार्थ या दोन्हींचाहि त्याग होतो तो होतोच. शिवाय ते व्यसनी बनतात; आणि वडिलांना उलट त्रास देतात. हा मात्र पालकांना त्यांचे स्वार्थत्यागाचा फायदा मिळतो खरा.

गोपाळराव अशा चैनी वर्गांतील नव्हते. आपला " अण्णा " आपल्या साठीं इतकी काळजी घेतो आणि इतकी अडचण सोसतो तर त्याचें ओझें होईल तितकें आपण कमी करावें हाच विचार त्यांच्यापुढें दत्त म्हणून उभा असे, आणि म्हणूनच ते केव्हां केव्हां एखादी दुसरी शिकवणी मिळाल्यास ती पत्करून अण्णांवरील आपल्या खर्चाचा बोजा तितका कमी करीत. त्यांची अशी स्थिती होती तरी ते कधीं कोणाशीं लाचारतेनें वागत नसत. इतक्या लहान वयांतहि त्यांच्या आंगीं एवढा स्वाभिमान व मानीपणा होता.

त्यांना आपल्या वयाच्या मुलांत वक्तृत्व करून दाखविण्याची फार हौस असे व केव्हां केव्हां ते कांहीं तरी विषयावर बोलतहि असत. इंग्रजी सातवे इयत्तेंत ( मॅट्रीक ) १८८१ सालीं पास झाल्यानंतर त्यांनीं एकदां " कर्तव्य " या विषयावर आपल्या वर्गांतील मुलांतच भाषण केलें होतें, त्या वेळचें त्या चिमुकल्या मूर्तीचें चिमुकलें पण बहुमोल भाषण ऐकून सर्वांच्या मनास फार आनंद व समाधान वाटलें. तें संपूर्ण जरी आज उपलब्ध नाहीं तरी तत्कालिन एका श्रोत्याच्या स्मरणशक्तीच्या आधारानें सारांशरूपानें पुढें देत आहें.

ते म्हणाले, " आपण विद्यार्थी लोक वेळाचें महत्त्व व योग्यता अगदींच जाणत नाहीं व आपलें कर्तव्य आणि जबाबदारी याचाहि विचार करीत नाहीं ही आपली मोठी चूक आहे. आपला लहानपणचा वर्तनक्रम हाच पुढील आयुष्यरूपी इमारतीचा पाया होय, करितां तो जितका दिवसेंदिवस अधिकाधिक मजबूत व घट्ट होत जाईल तितकी इमारत ( योग्यता व कर्तबगारी ) उंच वाढविण्यास पात्र होईल. अशा रीतीनें भावी पिढी सुधारल्यास उत्तरोत्तर पुढील पिढीसही तेंच वळण लागून, सर्वत्र माणसें उद्योगांत निमग्न होऊन, समाज किंवा राष्ट्र यांचीहि उन्नति होईल, व सर्व देश भरभराटीस येईल.

ह्या जगांत आळशा सारखा दुसरा उधळ्या नाहीं. आतांच उपयोग केला असतां जी घटका अमोलिक ठरते, व एकदां गेली ह्मणजे कोणत्याहि युक्तीनें कालत्रयीं परत आणितां येत नाहीं, ती घटका तो व्यर्थ झुगारून देतो. आळस हा मनुष्याचा खरोखर शत्रु आहे. आळस हा सैतान आहे व तो सकाळींच आपण लौकर उठूं नये म्हणून केवळ आपल्यावर पहारा करीत असतो. परंतु दृढ निश्चयानें आपण लवकर उठण्याची थोडे दिवस सवय केल्यास, आपल्यापुढें त्याचें कांहींच चालत नाहीं. मलासुद्धां यानें फारच गांठलें होतें व त्यांतल्या त्यांत माझी झोंपहि जरा गाढ असल्यामुळें ह्या सैतानाचा माझ्यावर बराच पगडा बसूं लागला होता. परंतु त्यावेळीं मी अशी युक्ति काढिली कीं, घरांतील ह्यातान्या माणसांस स्वाभाविकच लवकर उठण्याची सवय असल्यामुळें त्यांनीं मी वेळेवर न उठल्यास चिमटे काढून तरी मला उठवावें ह्मणून सांगून ठेविल्यामुळें तीं मला उठवीत असत. असे कांहीं दिवस गेल्यावर मला आपोआपच सवय झाली व मी आतां वेळेवरच उठतों व त्यामुळें आतां माझा सर्व कार्यक्रम आनंदानें व व्यवस्थेशीर रीतीनें पार पडतो. ह्या सवयीचा फायदा किती अवर्णनीय आहे; ह्याची कल्पना कोणास तसें केल्याशिवाय येणार नाहीं व पटणारही नाहीं. मात्र हें आपल्या कृतनिश्चयावर अवलंबून आहे. जितका निश्चय कमजोर असेल तितका ह्या सैतानाचा पगडा आपणांवर जास्ती बसतो आणि तसें झालें म्हणजे आपण साहजिक त्याच्या कबजांत मिळतों. समजा, आपणांपैकीं एखाद्यानें उद्यांपासून सकाळींच चार वाजतां उठणार असा ठाम निश्चय आतां केला आहे. परंतु दुसरे दिवशीं सकाळींच उठण्याचा प्रसंग आल्याबरोबर तोच निश्चय जरा नरम पडूं लागतो व ठाम झालेला विचारहि थोडाबहुत मार्गे सरकूं लागतो, आणि आपणच आपल्या मनांत कांहींनाकांहीं सबबी आणून उठण्यास दिरंगाई करूं लागतों, अशा रीतीनें आपण आपल्या कृतसंकल्पापासून ढळतों! ह्याचें कारण, आपला निश्चय ऐन वेळीं कमजोर झाल्यामुळें, सैतानाचा जोर सरशी करतो हेंच होय; किंवा निश्चय करते वेळीं जी आमची "बोलण्याची" तयारी असते ती कृति करण्याचा प्रसंग आला असतां "करण्याची" नसते. अर्थात् आमचा निश्चय कृतीच्या वेळीं बहुतेक डळमळतो, हाच आमच्या स्वभावाचा उणेपणा. करितां आपण बोलण्याप्रमाणें आचरण करण्यांत दृढनिश्चयी झालें

पाहिजे. एखाद्या मोठ्या हुद्यावरील किंवा विद्वान् मनुष्याचें मी नांव ऐकिलें ह्मणजे मला त्याच्या चरित्राची माहिती केव्हां मिळेल असें होतें व त्याच्या गुणांत कांहीं व्यंग असल्यास मी इतर लोकांप्रमाणें त्याकडे बिलकूल लक्ष न देतां चांगल्या गुणांचीच प्रशंसा करितों आणि त्यांचें मनन करितों. माझें असें ठाम मत आहे कीं कोणी कोणाच्या दुर्गुणांकडे लक्ष न देतां व त्यांचा ऊहापोह फारसा न करितां सद्गुणांवरच लक्ष देऊन ते आपल्याहि आंगीं उतरविण्याची खटपट करावी. एकदां आपणास दुसऱ्याच्या व्यंगाकडेच लक्ष देण्याची सवय झाली ह्मणजे त्याच्या सद्गुणाकडे दुर्लक्ष होऊन दोषैक दृष्टीनें आपण त्याच्याकडे पाहून टीका करूं लागतों आणि त्याच्या सद्गुणांचा आपण कांहीं एक फायदा न घेतां उलट आपला स्वभाव काकदृष्टि व नालायक बनवितों; तरी असें न करितां त्याचे दुर्गुण आपल्या अंगीं न येण्याबद्दल व सद्गुण ग्रहण करण्याबद्दल खटपट करावी.

एक नामांकित विद्वान् गृहस्थ माझ्या वडिलांचे स्नेही आहेत, म्हणून माझेंही त्यांच्याकडे कधीं कधीं जाणेंयेणें होत असतें. त्यांचें वर्तन इतकें नियमित व कित्ता घेण्यासारखें आहे कीं तें मला तुम्हांस योग्य रीतीनें समजावून देणेंही अशक्य वाटतें. ते जो मला वेळोवेळीं बोध करितात तो मी तुम्हांस सांगतों. ते म्हणतात कीं आपण कोणाचा हेवा करणें, कोणाच्या हलक्या गोष्टी मनांत आणणें, किंवा कोणाची निंदा करीत बसणें म्हणजे आपल्या अमोलिक वेळाचा खून करण्यासारखें होय. त्या वेळाचा आपण दुसऱ्या पुष्कळ चांगल्या कामांत उपयोग करूं शकतों. ते आपला वेळ कधींच फुकट घालवीत नाहींत व इतर लोकांप्रमाणें विडी, पान तंबाखु वगैरे सर्वसाधारण व्यसनांपैकीं सुद्धां कोणतेंहि व्यसन त्यांना नाहीं. ते सांगतात कीं, ह्या व्यसनांची मनुष्यास बिलकूल जरूर नसतां तीं संगतीनें लोक जडवून घेतात आणि मग शरीरावर त्यांचा वाईट परिणाम झाला तरी पुष्कळ दिवसांची सवय झाल्यामुळें तीं त्यांच्यानें सोडवत नाहींत. व तींहि व्यसनें आपल्या आश्रयदात्यांना सोडीत नाहींत.

तसेंच कोणत्याहि स्थितींतल्या मनुष्यास जास्तींत जास्ती ६ ते ७ तास झोंप पुष्कळच झाली व तेही स्वतः रात्रीं ९ वाजतां निजतात व सकाळीं ४ वाजतां बरोबर उठतात. त्यांचें वय ६२ वर्षांचें आहे तरी ते चांगले सशक्त व काटक आहेत. त्यांचे दांत अगदीं मजबूत

व पांढरे शुभ्र स्फटिकाप्रमाणें दिसत असून ओंठहि ताम्रवर्णी आहेत. त्यांना वाचतांना चष्मा लागत नाहीं, चालतांना काठी टेंकावी लागत नाहीं किंवा थकवाहि येत नाहीं, इतके ते मजबूत आहेत. परंतु आजकालच्या बहुतेक व्यसनी तरुण पिढीकडे पाहिलें असतां सर्वच उलट प्रकार दिसून येतो व अंगावर शाहारे उभे राहतात. ह्याचें कारण दुसरें कांहींच नसून व्यसनें व सर्व वर्तनांत अनियमितपणा हेंच होय. हीं व्यसनें ह्मणजे महारोगांपैकीं कांहीं रोग आहेत त्यांच्यांत जे आपल्याला गुरफटून घेतात ते बहुतकरून आपल्या लाभास आंचवल्याशिवाय राहत नाहींत, हीं व्यसनें ह्मणजे आपलें शरीर आपणास न कळत आंतून पोखरणारे व दिवसेंदिवस जास्त जास्त पोकळ करणारे उंदीर व घुशी होत. ह्याचा विचार न करितां कोणी पानसुपारी चघळण्यांत पटाईत होण्यांत, तर कोणी विडीच्या झुरक्यांत खुष होण्यांत, कोणी अफूंत निमग्न होण्यांत, तर कोणी घोट्यांत गुंग होण्यांत, कोणी ख्याली खुशालींत गर्क होण्यांत, तर कोणीं तंटेभांडणांत दंग होण्यांत केवळ वेडे बनल्यामुळें त्यांचा तो आनंद, तें सुख व तो आदर याची परमावधी होऊन जाते. अशा रीतीनें एक ना दोन अनेक प्रकारच्या व्यसनांच्या मोहपाशांत पडल्यानंतर त्यांचें तें बुद्धिसुख, त्यांचें ते समाधिसुख, त्यांचें तें एकतानतेचें सुख काय वर्णावें ? तें त्यांना त्यांच्या कुटुंबासह रसातळाला मिळवितें. शिवाय हीं व्यसनें इतकीं हरामखोर आहेत कीं, त्यांच्यावर प्रीति करून त्यांना जो जवळ करील त्याच्या छातीवर हीं बेधडक व बेमुर्वत जाऊन बसतात. मग त्यांना वेळ ना काळ ताळ ना तंत्र, कांहींच नाहीं, इतकीं तीं जात्याच कृतघ्न व बेशरम असल्यामुळें त्यांना जो जवळ करील त्याला सुद्धां बेशरम बनवून त्याची स्थिती दुःखास्पद व हृदयद्रावक करितात. उदाहरणार्थः—आजकाल लोकांत बलवत्तर झालेलें दारूचें व्यसनच पहा ! ह्या व्यसनाचा फैलाव जिकडेतिकडे किती झालेला आहे ? त्याच्यापुढें मनुष्याला कपड्यालत्त्याची किंवा खाण्यापिण्याची सुद्धां पर्वा नसते. रोज निदान ४ ते ८ आण्याची दारु लागतेच, शिवाय सोबतीला कोणी असल्यास विचारूंच नका. अशा रीतीनें रोजचे ४।८ आणे झाले तरी व्यसनामुळें खर्च करण्याचें कांहीं वाटत नाहीं. परंतु त्याच्या सर्व हयातींत नुसता दारू करितांच निरर्थक पैसा किती जातो ह्याचा हिशोब करा. समजा हें व्यसन मनुष्याला त्याच्या वयाच्या २० व्या वर्षी जडलें आहे व तो साठाव्या वर्षी मरण पावला तर

रोजचे ६ आणे धरले तरी महिन्याचे ११। सवा अकरा रुपये झाले व वर्षाचे १३५ आणि ४० वर्षांचे ५४०० रुपये झाले. दुसरें, दारूबरोबर विडीचेंहि व्यसन सर्व साधारण असावयाचेंच, त्याला निदान प्रत्येक दिवशीं ३ ते ४ पैसे पाहिजेतच आणि तें तर १५ व्या वर्षापासूनच जडलेलें असतें. अर्थात् रोजचे ३ पैसे धरिले तरी महिन्याचे १ रु. ६ आ. ६ पै. एक वर्षाचे १६ रु. १४ आणे आणि ४५ वर्षांचे ७५९ रु. ६ आणे झाले, ह्या दोन्हीं व्यसनांची मिळून ६००० रु. वर रकम गेली. कारण एकाच मनुष्याला दोन, तीन व्यसनें बहुतेक असतातच ह्मणजे मरतेसमयीं त्याचे जें ६००० रुपये तरी निदान शिल्लक राहिले असते ते फुकट जाऊन त्यावद्दल अब्रूची हानी, मानहानी, द्रव्यहानी, आणि शरीरहानी वगैरेचा मात्र फायदा मिळतो.

बरें ज्या वेळीं असल्या " समानशीले व्यसनेषु सख्यं " पैकीं मंडळीचा कंपू गप्पा मारीत वसतो,तेव्हां त्यांचा बोलण्याचा विषय दुसरा कांहींच नसतो. जो तो आपापल्यापरी आपापल्या व्यसनाची तारीफ करीत असतो, कोणी ह्मणतो मी बेवड्याची बाटली एकदां तोंडास लाविली कीं एका दमांत सगळी खलास करतों, तर कोणी ह्मणतो मला दिवशीं १०० विड्या पुऱ्याच पडत नाहींत, कोणी ह्मणतो मला २०० पानें तरी निदान दिवसास लागतातच, तर कोणी ह्मणतो मी घोड्याचा कळशीएवढा लोटा तोंडाला लाविल्यानंतर संपेपर्यंत खालींच ठेवित नाहीं, तर कोणी ह्मणतो हिरव्या तंबाखुची चिलीम भरलेली असली तरी मी एका झुरक्यांत विस्तव खड्याला आणून भिडवितों. असें त्या व्यसनभक्तांनें चऱ्हाट एकदा सुरू झालें ह्मणजे काय विचारतां, केवळ एरंडाचें गुऱ्हाळ, त्याला रस ना चोंथा–जणूं काय–ज्याला त्याला असें वाटत असतें कीं, मी एक युनि-व्हर्सिटीचा पदवीधरच आहें. आणि खरोखरच एखादी युनिव्हर्सिटी जर या व्यसनी लोकांना डिग्री देण्याकरितां उत्पन्न झाली असती तर आपल्या सध्यांच्या स्थानिक युनिव्हर्सिटीच्या पदवीधरांपेक्षां किती तरी पटीनें जास्ती पदवीधर ह्या युनि-व्हर्सिटींतून दरवर्षी बाहेर पडले असते. कारण त्यांची तपश्चर्याच तशी प्रखर ! मग ती व्यसन देवता तरी आपल्या व्यसनभक्तांना कां प्रसन्न होणार नाहीं, तिला तर आपली भक्त मंडळी जितकी जास्त वाढेल तितका जास्त आनंद होऊन त्यांचीहि बेअब्रू वजा अब्रू केव्हां वाढेल असें होतें; परंतु अशा बेअब्रूदार लोकांच्या कमनशिबानें त्यांच्याशिवाय

दुसऱ्या कोणालाच अशा युनिव्हर्सिटीची जरूर भासत नाहीं. ह्मणून ती स्थापन करण्यांत पुढाकार कोणींच घेत नाहीं. कारण या युनिव्हर्सिटीच्या परिक्षेस बसणारे शेंकड्याला शेंकडा पास होणार. नापास कोणीच होणार नाहीं अशी त्यांची खात्री असते. अशा रीतीनें ही युनिव्हर्सिटी भरभराटीला आल्यास आपल्या चालू युनिव्हर्सिटी सर्व मागें पडून ह्या नव्या युनिव्हर्सिटीकडेच विद्यार्थ्यांचे थव्याचे थवे घुसतील अशीही भीति वाटते.

बरें ! या कामांत ह्या व्यसन-भक्तांपैकींच कोणीतरी पुढाकार घेईल ह्मणावें तर त्यांना त्या व्यसनदेवीच्या तपश्चर्येपुढें कांहींच सुचत नाहीं आणि वेळहि मिळत नाहीं. करितां या कामीं कोणीतरी दयाळू होऊन अशा लोकांना " डिग्री " नव्हे " डिक्री " देण्याकरितां युनिव्हर्सिटीच्या ऐवजीं एखादें स्मॉलकॉजकोर्ट नवीन उघडण्याची खटपट करील तर जुन्या कोर्टांतील गर्दीतरी कमी होईल. लहानसहान खेड्यापाड्यापासून तों मोठमोठ्या शहरांत तरी एखादें कुटुंब गृहकलह व व्यसनरहित मिळेल कीं नाहीं याची आजकाल शंकाच आहे. तसें असतें तर तंटे भांडणें करून व कर्ज बाजारी होऊन कोर्टाची भर करण्यापेक्षां एकोप्यानें व निर्व्यसनी राहून विद्याभ्यासानें युनिव्हर्सिटीची भर करणें प्रत्येकाला अधिक आवडलें असतें. परंतु ते विचारे तरी आपण होऊन ओढून आणलेल्या आपल्या दुर्दैवाला काय करितील ? आणि तो दुर्दैवरूपी पाहुणातरी किती लोचट ? त्याला असल्या लोकांशिवाय इतरांकडून यथेच्छ पाहुणचार मिळत नसतो ह्मणून अगर ह्या लोकांनीं त्याला पहिल्यानें आदरसत्कारानें आपल्याकडे ओढून आणिला ह्मणून तो तर त्यांच्या पाहुणचाराचा त्यांना पुरापुरा मोबदला दिल्याशिवाय पिच्छाच सोडीत नाहीं. हा केवळ व्यसनांचा प्रभाव. हीं व्यसनें ज्या व्यक्तींत, ज्या कुटुंबांत, ज्या घरांत, ज्या गावांतच नव्हे ज्या देशांत घुसलीं त्या त्या ठिकाणीं त्यांनीं त्यांस नामशेष करून टाकलें आहे. ह्याचा अनुभव मोठमोठ्या शहरांतील बकाल वस्तींत फारच उत्तम रीतीनें पहावयास मिळतो. अशा व्यसनामुळें दुर्दैवी बनणाऱ्या माणसांना वेळाची किंमत किती अमूल्य आहे ह्याची कल्पना तरी कधीं डोक्यांत येते काय ? आणि जर त्यांना वेळाची खरी किंमत समजेल तर ते व्यसनांत सर्व वेळ फुकट घालवून आपली इतकी क्षीणावस्था करून घेतील काय ? नाहीं. वेळाचें महत्त्व किती आहे व त्याचा सदुपयोग कसा केला पाहिजे हें बहुतेक त्यांच्या स्वप्नींहि नसतें. हेंच त्यांचें व त्यांच्या हितचिंतकांचें दुर्दैव होय. करितां

ह्या व्यसनांचा आपणांस विटाळ सुद्धां न होण्याची खबरदारी प्रत्येकानें घेतली पाहिजे व वेळाचा सदुपयोग हेंच आपलें खरें भांडवल, हे लक्षांत ठेविलें पाहिजे. वेळाचा सद्व्यय न करणें हें सुद्धां एक व्यसनच समजलें पाहिजे. आणि दिवसाचा प्रत्येक तासच नव्हे तर प्रत्येक मिनिटाचा सदुपयोग करण्याची काळजी घेतली तरच आपण आपलें कर्तव्य बजाविलें असें होऊन आपली कर्तबगारी जगाच्या निदर्शनास येईल.

प्रत्येकानें अत्यंत उच्च, उदात्त व पवित्र ध्येय आपल्या नजरेसमोर नेहमीं ठेविलें पाहिजे व तें मिळविण्यास लागणारीं सर्व आनुषंगीक साधनें, विचार व आचाररूपानें तन, मन, धन लावून व आटोकाट मेहनतीनें मिळवीत गेलें पाहिजे. असें करीत असतांना आपण जरी वाटेल तितक्या विपत्तींत पडलों असलों, आपणावर वाटेल तितकीं संकटें आलीं असलीं, आपण वाटेल तितक्या निकृष्ट स्थितीला पोंचलेलों असलों, आपणांत वाटेल तितका चिंतानल पेटलेला असला तरी जर आपलें ध्येय आपले दृष्टीपुढें अढळ असलें तर आपणास निराशेचें कांहीं एक कारण नाहीं. उलट आपण कांहीं काळानें तरी सौख्यांत डुबून जाऊं, उत्कृष्ट स्थितीनें माखले जाऊं, सुवर्णानें मढविले जाऊं, हिऱ्यामाणकांनीं भारून निघूं, परंतु तेंच उच्च ध्येय दौर्बल्य, दैन्य, दारिद्र्य, नेभळटपणा, स्वाभिमानशून्यता, कर्तव्यहीनता व आत्मविस्मृति वगैरे आपत्तींना कंटाळून टाकून दिलें असलें तर सर्वच निरर्थक होईल. करितां सतत उदात्त ध्येय मनांत जागृत ठेविलें पाहिजे व धैर्य, शांति, आत्मविश्वास, उत्साह, कर्तव्यदक्षता व दीर्घोद्योग वगैरे निश्चित, सन्मार्गदर्शक, महत्वाच्या व यशस्वी उपायांच्या सामर्थ्यानें प्रयत्न केला पाहिजे. कोणत्याहि प्रकारचें ध्येय असो, त्याची गोडी लागून सतत अभ्यासानें त्यांत परिपक्व होण्यास व त्यांत प्राविण्य संपादन करण्यास निदान एक तप ( १२ वर्षे दिवशीं निदान १२ तास काम करून ) तरी घालावें लागतें व हा उमेदवारीचा काळ संपल्यानंतर त्याचें फळ आपणास व आपल्या अनुषंगिकांस मिळूं लागतें. करितां मध्यंतरीं मनाची कधीं चलबिचल होऊं देतां कामा नये. मन हेंच ह्या सर्व सुखदुःखाचें किंवा बऱ्यावाईट स्थितीचें मूळ आहे व मनुष्य हाच स्वतःची श्रीमंती, गरीबी, परिस्थिती व भवितव्यता यांचा नियंता आहे. तसेंच भय, अपयश व दुःख वगैरेपासून मुक्त होण्याचें सामर्थ्यही त्यासच आहे, हें प्रत्येकानें लक्षांत ठेविलें पाहिजे.

समजा! शाळेंत असतांना एका मुलाचा सदोदित पहिल्यापासून पांचपर्यंत नंबर असे व दुसऱ्याचा पांचांच्या खालीं असे, अर्थात् ज्याचा नंबर वर होता तो खालच्या नंबराच्या मुलापेक्षां साहजिक हुशार असला पाहिजेच. किंवा दोघेहि सारखे हुशार असल्यास एक दुसऱ्यापेक्षां अभ्यासी असला पाहिजे. पुढें वरच्या नंबरचा मुलगा ५–६ इयत्ता झाल्यावर अभ्यास सोडून घरीं राहिला व दुसरा (खालच्या नंबरचा) तसाच अभ्यास चालू ठेवून कांहीं वर्षांनीं एम. ए. झाला. ह्यावरून आपल्या लक्षांत येईल कीं, ईश्वरानें दिलेल्या बुद्धीचा वरच्या नंबरच्या मुलापेक्षां खालच्यानें अधिक उपयोग केला म्हणून त्यानें आपली योग्यता एखाद्या कॉलेजांत प्रोफेसर होण्याची व लोकांत मानमान्यता मिळविण्याची केली, व वरच्या नंबरच्या मुलानें बुद्धीचा उपयोग न केल्यामुळें तो गांवकुटाळ बनला व त्यानें लोकांत आपलें वजन कमी केलें. ईश्वरानें सर्वांस बुद्धि दिलेली असतेच, परंतु ती वाढविण्याचें काम ज्याचें त्याच्यावर आहे. ती जितकी अधिकाधिक वाढविण्याची खटपट मनुष्य करील तितकी जास्त पात्रता त्याच्या अंगीं येईल, जितकी जास्त पात्रता येईल तितकी त्याची जास्त योग्यता वाढेल आणि जितकी जास्त योग्यता वाढेल तितका त्याचा जास्त मान वाढून तो लोकप्रिय होईल. कोणी ह्मणेल कीं, वरच्या नंबरच्या मुलाची गरीबीमुळें किंवा इतर कांहीं कारणामुळें अभ्यास करण्याच्या लायकीची परिस्थिती नव्हती ह्मणून त्याला घरीं राहावें लागलें; परंतु या ह्मणण्यांत तथ्यांश फार थोडाच आहे, मात्र इतकें खरें कीं त्याचें जें आपल्या ध्येयावर निस्सीम व उत्कृष्ट प्रेम पाहिजे होतें तितकें नव्हतें. तें जर भरपूर असतें तर त्यानें वाटेल त्या परिस्थितीमध्यें आणि वाटेल त्या अडचणी सोसून आपलें ध्येय मिळविण्याची खटपट केली असती. परंतु प्रेमाभावीं तें होणें शक्य नाहीं. ईश्वरानें प्रत्येकाला बुद्धि दिलेली असली तरी तिचा जसा योग्य उपयोग केला पाहिजे तसा पुष्कळ लोक करीत नाहींत ह्मणूनच त्यांना शोचनीय स्थिती प्राप्त होते.

कोणीही कोणत्याहि बाबतींत प्रकृतिची हेळसांड करूं नये. प्रत्येकानें आपल्या प्रकृतिविषयीं अत्यंत काळजी घ्यावी, जेवणाखाण्यांत नेमस्तपणा नसणें, पक्वान्नें अगर इतर जड पदार्थांचें अति सेवन करणें, दररोज मोकळ्या हवेंत न फिरणें किंवा व्यायाम न करणें, अंतःकरण प्रसन्न राहण्याकरितां, वृत्ति उल्हसित होण्याकरितां, विचारांना स्फूर्ति मिळण्याकरितां, साधुसंतांच्या व थोरमाणसांच्या वचनाचें मनन करून निश्चयानें

आत्मसंयमन करण्याचें बळ प्राप्त होण्याकरितां कांहीं कालपर्यंत तरी ईश्वराची अनन्य भावानें प्रार्थना न करणें; ह्मणजे प्रकृतिची केवळ हेळसांड करणें होय.

तसेंच आपल्या आईबापांस आपल्यासाठीं किती त्रास भोगावा लागतो, याची आठवण ठेवा. त्यांतल्यात्यांत मातृदैवताचे तर आपणावर फारच उपकार झालेले असतात. आपण उत्पन्न झाल्यापासून आपल्या संगोपनासाठीं आईला कसकसे त्रास सोसावे लागतात, याची कल्पनाही होणें शक्य नाहीं व असले थोडेबहुत तरी पुष्कळांचे आपण उपकारी असतों याची आठवण असूं द्या, आपण जन्माला येतों तेव्हां कसे सर्व तऱ्हेनें पंगु असतों हें आपल्यासमोर इतर मुलें जन्मतात त्यावरून लक्षांत आणा. आईबापाचे आपण किती उपकारी आहों, तें मोठमोठ्या कवि व साधुपुरुषांनीं स्वतःच्या अनुभवावरून निरनिराळीं वचनें दिली आहेत त्यावरून समजेल. ते ह्मणतातः—

"तुका ह्मणे मायबापें ॥ अवघीं देवाचीं स्वरूपें"

भावार्थः—तुकाराम ह्मणतात, आईबाप हीं इहलोकचीं दैवतें आहेत.

"ह्मणोनि ह्मणती भले न ऋण जन्मदेचें फिटे"

मोरोपंत.

भावार्थः—ह्मणून ज्ञाते लोक ह्मणतात जन्मदात्या आईचे अनंत उपकार कधींहि फिटावयाचे नाहींत.

मातृदेवो भव! पितृदेवो भव!

तैत्तिरिय उपनिषद.

भावार्थः—आईबापांस देवाप्रमाणें मान.

"न मातुः परं दैवतम्"

भावार्थः—आई सारखें दुसरें दैवत नाहीं.

इतके आपण आईबापाचे उपकारी असतांना त्या उपकारांची जाणीव आपण शेवटपर्यंत ठेवितों काय? याचा विचार करा. तसेंच वडिलांचा व गुरुजनाचा अनादर करण्याकडे अलीकडील मुलांची आणि तरुणांची प्रवृत्ति होणें, व्यक्तिहिताच्या थोड्याशा स्वार्थासाठीं दुसऱ्याचें सबंध नुकसान झालें तरी पर्वा न करणें, परस्परांविषयीं विश्वासबुद्धि व विश्वासजनक वागणूक हीं कमी असणें, आपल्या सर्व कृत्यांत नियमितपणा मुळींच नसणें,

एकनिष्ठतेनें निकराचे प्रयत्न करून एखादें कार्य तडीस नेण्याचें सामर्थ्य नसणें, परस्पर कलहामुळें भयंकर हानि होत आहे, हें ढळढळीत डोळ्यांनीं दिसत असूनहि तो कलह सोडण्याची तयारी नसणें वगैरे गर्ह्य प्रकार आजकाल जिकडे तिकडे स्पष्ट दिसतात; त्यांचें निर्मूलन करण्याकरितां व शिस्तीचें एकसारखें उल्लंघन होत असल्यानें हा अनिष्ट प्रकार समाजांत घुसलेला आहे, तो दूर करून शिस्तीचें कडक अवलंबन करण्याकरितां मुलांना लहानपणापासून सत्याची गोडी लावण्याविषयीं फार जपलें पाहिजे. त्यांनीं लबाडी केल्यास, दुसऱ्याची कागाळी केल्यास अगर असलेच कांहीं द्वाडपणाचे प्रकार केल्यास वडिलांनीं किंवा गुरुजनांनीं त्यांकडे केव्हांही दुर्लक्ष करितां नये. मुलांच्या शिस्तीच्या बाबतींत फारच कडकपणा ठेवून त्यांचा हट्ट कधींहि चालूं देऊं नये आणि आपणाला इष्ट वाटणारी गोष्ट त्यांनीं करीतोंपर्यंत त्यांची केव्हांहि गय करतां कामा नये.

नीतिशिक्षणाचे पाठ देणाऱ्या शिक्षकांचें वर्तन अत्यंत आदर्शवत् असलें पाहिजे, त्यांनें स्वतःचें शील उत्तम पाहिजे, आणि ज्या विद्यार्थ्याला हें शिक्षण द्यावयाचें त्या विद्यार्थ्यांचें शील सुधारण्याविषयीं त्यांना खरी तळमळ पाहिजे. त्यांची सद्धर्मावर निष्ठा असली पाहिजे आणि आपलें कर्तव्य ते उत्तम प्रकारें जाणत असले पाहिजेत. जे गुण आपल्या मुलांच्या आणि विद्यार्थ्यांच्या अंगीं यावयास पाहिजे आहेत असें आईबापांस आणि गुरूंस वाटतें, ते गूण त्यांनीं हर प्रयत्नानें आपले ठायीं आधीं पुष्कळ सांठविले पाहिजेत; आणि ते मुलांच्या व विद्यार्थ्यांच्या अनुभवास आणून दिले पाहिजेत ह्मणजे तें कार्य साधेल. मातापितरें आणि गुरु हे जर निश्चय धरून आपल्या सर्व व्यवहारांत निरंतर सचोटीनें, चिकाटीनें व नियमितपणानें वागतील तर त्यांचीं मुलें आणि त्यांचे विद्यार्थी हे सगळे त्यांच्यासारखे नियमित होतील यांत शंका नाहीं. अशा रीतीनें खरी कर्तबगारी दिसून येण्याला मनाचा दृढ निश्चय, निकराचे प्रयत्न, सततोद्योग आणि कर्तव्यनिष्ठा हे गुण तीव्रतेनें मुलांच्या आंगीं बाणले जातील आणि ज्यांच्या आंगीं हे गुण बाणले जातील त्यांची कर्तबगारी जगाच्या निदर्शनास आल्यावांचून कधींहि राहावयाची नाहीं.

---

आहे त्याच स्थितींत प्रयत्न केला पाहिजे. ज्या गोष्टी आपल्या हातच्या नाहींत व जी परिस्थिती आपल्याला आज बदलतां येण्याजोगी नाहीं, तिच्यावरच सर्व दोष ठेवून मोकळें होणें व आपलें कर्तव्य विसरणें हें [illegible]या कर्तव-

गारीचें लक्षण नव्हे. अशा तऱ्हेच्या कर्तव्यपराङ्मुख लोकांमध्यें नशीब हें लंगडें घोडें मधें मधें ढकलण्याचा फार प्रघात आहे. थोडें कांहीं जास्तीं कमी झालें कीं जो तो नशीबावर लोटतो ह्मणजे जणूं काय आपणावर कांहींच जबाबदारी नाहीं; परंतु हें कितपत खरें आहे ह्याचा विचार करा. मला तर असें वाटतें कीं आपण आपलें कर्तव्य बरोबर न बजावल्यामुळें जी आपणाकडून चूक होते ती आपल्यावर इतरांकडून लादली न जावी, व लोकांचा शब्द आपणावर न यावा, तसेंच लोकांची समजूत घालण्याकरितां व आपली कशीतरी करून घेण्याकरितां ही सबब पुढें आणण्यांत येते. ही सबब ह्मणजे केवळ आळसाचें व नामर्दपणाचें द्योतक होय.

बहुतेक मुलांना कधीं कधीं भलताच फाजीलपणा, निरर्थक ऐट व चट्टीपट्टी करण्याची सवय संगतीनें लागते व वडील माणसें अति लाडानें किंवा प्रीतीनें आंधळीं होऊन त्यांकडे कानाडोळा करितात. परंतु तीच संवय पुढें वाढत जाऊन मग मुलें नादी होतात आणि वयांत आल्याबरोबर स्वातंत्र्यप्रिय होऊन वडिल माणसांबरोबर राहिल्यास त्यांच्या मनास वाटेल त्या रीतीनें वागणें कठीण जातें ह्मणून आईबापांपासून सुद्धां वेगळीं राहतात.

अल्प शिक्षणानें व कुसंगतीनें कित्येकांना दुसऱ्याची थट्टा करण्याचीहि वाईट संवय लागते आणि मंडळीमध्यें कोणाची तरी थट्टा करून लोकांना हंसविण्याची त्याला गंमत वाटते. क्षणभर गंमत जाहल्यामुळें त्यासही पुनः पुनः तसें करावेंसें वाटतें. असें होतां होतां त्यास इतकी वाईट संवय जडते कीं, एखादे वेळेस एखादी गोष्ट बोलावयाची मनांत येऊन ती अप्रासंगिक असली तरी बोलल्याशिवाय त्याच्यानें राहवत नाहीं आणि अशा रीतीनें हळुहळु जास्ती संवय वाढत जाऊन त्याचा वात्रटपणा इतक्या थराला पोंचतो कीं अश्लील किंवा अपशब्दाशिवाय तो बोलतच नाहीं. आणि मग लोक त्याला चावट किंवा मूर्ख ह्मणूं लागतात. कधीं कधीं अशा थट्टेचा इतका भयंकर परिणाम होतो कीं परस्परांमध्यें द्वेष उत्पन्न होऊन हाणामारीपर्यंत सुद्धां प्रसंग येतात. असा हा दुष्परिणामी स्वभाव बनविणें हितावह होईल काय ?

अल्प शिक्षण मिळाल्यामुळें बहुतेक वृथाभिमान, दुराग्रह वगैरे दुर्गुण वारंवार आपले [illegible]ा व व्यवहारांत उदयास येतात. आपलें तेवढें चांगलें असाच अभिमान आंगीं [illegible] त्या बाहेर आपणांस कांहीं शिकण्यासारखें नाहीं असा दुराग्रह उत्पन्न होतो.

परंतु असा दुराग्रह देशोन्नतीस तर काय परंतु प्रत्येक व्यक्तीच्या उत्कर्षास फारच घातक आहे. करितां मोकळ्या व उदार मनानें, शोधक बुद्धीने सर्व विषयांकडे पाहणें व दुसऱ्याचे अभिप्रायावर फारसें अवलंबून न राहतां आपल्या सुविचारानें त्याचें मनन व चिंतन करून त्याप्रमाणें अभिप्राय ठरविणें हें कांहीं आत्मोन्नतीचें लहानसहान साधन नव्हे.

थोर पुरुषांच्या चरित्रांनीं व निरानिराळ्या ग्रंथांच्या परिशीलनानें मनुष्याचें मन सुसंस्कृत होतें, वृत्ति उदात्त बनते आणि शील नीतियुक्त होतें. आपण पाहतों कीं, विद्वान् घराण्यांतील मुलें बहुतेक विद्वान् होतात ह्याचें कारण एक तर गृहशिक्षण त्यांना योग्य मिळतें, दुसरें मोठमोठ्या विद्वान् लोकांशीं वारंवार निकट संबंध येतो व तिसरें उत्तमोत्तम पुस्तकांचें वाचन हेंच होय. हीं प्रत्येकाच्या अभ्युदयास किती आवश्यक आहेत. याचा सूक्ष्म रीतीनें व सांगोपांग विचार करणें फारच अवश्य आहे. त्याची योग्य रीतीनें छाननी, निवड आणि अभ्यास केल्यास तो एक क्षणिक करमणुकीचा प्रकार न होतां कल्पनाशक्ति, सहानुभूति, प्रेमळपणा व विविध नैतिक संवेदनाचा व्यवस्थित विकास करण्याचें प्रबळ साधन होऊन, नैतिकसत्य व मानवी मनोविकार यांना एक प्रकारचें विशदत्व, विचारबद्धत्व आणि मनोहारित्व प्राप्त होतें.

## आत्मैव आत्मनो बंधुः । आत्मैव रिपुरात्मनः ॥

"आपणच आपले स्वतः शत्रु किंवा मित्र आहोंत." कारण शुद्धाचरण व परोपकार बुद्धि हे गुण आपल्या ठिकाणीं असल्यावांचून सुखाचा लाभ होणें संभवनीय नाहीं. निर्मळ व व शांत विचारांनींच मन भरलेलें ठेविलें पाहिजे व जें कृत्य केल्यानें आपलें मन आपल्यास टोंचील अशा आचरणाचा, चिंतेचा व उद्वेगाचा अव्हेर केला पाहिजे. दुष्टबुद्धीचा प्रतिकार केल्यानें, वासनांस अंकित ठेविल्यानें व आपल्या ठिकाणीं बसणाऱ्या सौजन्य वृत्तीस उत्तेजन देऊन तिची उत्तरोत्तर वृद्धि केल्यानें आपलें मन शुद्ध व शांत ठेवितां येईल. षड्रिपूंस जिंकण्याकरितां आपली व्यसनासक्ति आळ्यांत ठेवावी लागते व खुद्द आपणांवर व आपल्या सर्व आचरणाच्या अल्प स्वल्प बाबींवर नजर ठेवणें जरूर आहे. परंतु हें पटत असून तसे न वागणारे लोक आजकाल किती बरें मिळतील ?

मनुष्यानें मरेपर्यंत विद्यार्थीच असलें पाहिजे म्हणजे त्याची सदोदीत कांहींतरी नवें शिकण्याकडे प्रवृत्ति असली पाहिजे. असेच लोक सद्गुणी निपजतात आणि जे सद्गुणी

तेच शहाणे, जे शहाणे तेच सज्जन आणि जे सज्जन तेच सुखी असतात. अशाच लोकांची पुढें थोर लोकांत गणना होऊन ते दूर असले तरी जवळ असल्या सारखे आहेत, विपन्न असले तरी संपन्न, अशक्त असले तरी सशक्त व मृत असले तरी जिवंत आहेत असेंच इतरांना वाटतें. कारण त्यांचीं सत्कृत्यें डोळ्यांसमोर सदैव दिसत असतात.

कालचक्राबरोबर समाजघटनेंत व व्यवहारांत अगदीं आपोआप फेरफार होत असतात, ते कोणाच्या हातचे नसतात; परंतु त्या फेरफारांस चांगलें वळण लावणें हें वर सांगितलेल्या विद्येनें, आचारविचारानें, आणि संभावितपणानें अत्यंत श्रेष्ठ अशा सत्पुरुषांच्याच हातीं असतें. कारण इतर माणसांपेक्षां प्रबुद्ध माणसांसच या कार्याची चांगली व स्पष्ट कल्पना असते.

पाश्चात्य देशांपैकीं बहुतेक देश सर्व बाबतींत किती पुढें गेले आहेत व तेथें जनतेस सुविद्य व ज्ञानी करण्याचे किती व कसकसे प्रयत्न चालतात या संबंधीं तिकडील शिक्षणावरील कांहीं पुस्तकें वाचल्यास लक्षांत येईल. परंतु आमच्या लोकांचें त्याकडे बिलकुल लक्ष्य जात नाहीं आणि अशा अत्यंत महत्वाच्या गोष्टींचा कोणी विचारहि करीत नाहीं ही गोष्ट शोचनीय नव्हे काय? त्या स्थितीशीं आपल्या इकडील शिक्षणाच्या स्थितीची तुलना केली ह्मणजे मनास वाईट वाटून तें उद्विग्न होतें; करितां अंतर्यामीं कर्तव्यजागृति ठेवून ज्या साधनांनीं त्या देशांनीं ही स्थिती प्राप्त करून घेतली त्यांचाच आह्मी सुद्धां अवलंब केला पाहिजे. आजचीं मुलें ह्मणजे पुढचे भावी कर्ते लोक, ह्यांना आज ज्या प्रकारचें वळण लागेल किंवा शिक्षण मिळेल त्या मानानें व त्याप्रमाणें तीं पुढें कर्तबगार होणार, यास्तव त्यांना उत्तम शिक्षण देणें हें बहुतांशीं वडील माणसांचे हातीं आहे आणि त्यांनीं बरोबर मनावर घेतल्यास मुलांना योग्य व उत्तम शिक्षण मिळेल. ह्या प्रयत्नाचें दृश्य फळ आजच्या आज जरी आपणास चाखावयास मिळालें नाहीं तरी कांहीं कालानें तें मिळून पुढील पिढ्यांसही उपभोगावयास मिळेल. यत्न केलाच नाहीं तर लहानपणचे दिवस कसे तरी जातातच. परंतु मोठें झाल्यावर लहान वय कशानें गेल्यामुळें पुढील जीवित कसें कष्टमय होतें व पुढें कसकशी संकटपरंपरा भोंवतीं ज्या लोकांच्या स्थितीवरून लक्षांत आणा; आणि तेंच लहान वय

शिक्षणांत गेल्यास पुढें मोठेपणीं माणसें किती कर्तबगार निपजतात व त्यांचें सर्व आयुष्य कसें सुखासमाधानांत जातें ह्याचाही पण विचार करूं.

त्या देशांनीं मुलांचें प्राथमिक व सक्तीचें शिक्षण पुरें झाल्यावर व आवडीच्या विषयांत व्यापारीशिक्षण संपादण्याइतका तो तयार झाल्यावर सक्तीनें व्यापारीशिक्षण देणाऱ्या शाळेंत त्याला जावें लागतें. प्रत्येक जातीच्या धंद्याकरितां त्या ठिकाणीं निरनिराळ्या शाळा असतात ह्मणून मुलाला ज्या विषयाची आवड असते त्या विषयाकरितांच मुद्दाम स्थापन झालेल्या शाळेंत तो जातो. शाळेंत मुलांपासून मुळींच फी घेत नाहींत व शाळामास्तरांना मुलांना शिकविण्याशिवाय दुसरें कांहीं काम नसतें ह्मणून ते राहिलेल्या वेळांत कारखानदार, प्रवासी, चित्रकार, शेतकरी वगैरेंच्या भेटी घेऊन त्या त्या विषयांची सर्व माहिती मिळवितात. एकंदरींत शिक्षणाची सुधारणा हेंच सर्वांचें ध्येय असतें. उगाच भाराभर निरर्थक गोष्टी मुळींच न शिकवितां ज्या माहितीची अत्यंत जरूरी असते अशाच गोष्टी प्रत्येकाला इतक्या उत्तम व प्रत्यक्ष प्रयोग वगैरे करून शिकविल्या जातात कीं त्याला त्या संबंधांत पूर्ण माहिती होऊन व स्वतः अनुभवही मिळून तो त्यांत इतका तरबेज होतो कीं, मग स्वतःचें डोकें खर्च करून त्यांत कांहीं सुधारणाहि तो करूं शकतो.

वर्गांत चांगलीं चांगलीं पुस्तकें वाचून घेतात. शिवाय मुलांना फावल्यावेळीं वाचण्याकरितां शाळेच्या पुस्तकालयांत चांगल्या पुस्तकांचा संग्रह केलेला असतो. रात्रीं आठ वाजल्यानंतर मुलांना करमणुकीच्या ठिकाणीं जातां येत नाहीं. मुलें सकाळीं लौकर उठतात व सायंकाळीं लवकर झोंपी जातात. त्यांना शाळेंतील अधिकाऱ्यांचा फार वचक असतो. त्यांना चांगल्या संवयी व शिस्ती लावणें हें शाळेंतील शिक्षणाचें मुख्य अंग समजलें जातें; चांगली वर्तणूक कशी ठेवावी, विनयशीलपणानें कसें वागावें, वडील माणसांशीं व परक्या ठिकाणीं गेल्यास कसें वागावें, आरोग्य व स्वच्छता ह्याची हेळसांड कधींहि होऊं न द्यावी वगैरे प्रत्येक गोष्ट मुलांना सवयीनें व स्वानुभवानें समजली पाहिजे. फक्त तोंडानें येऊन उपयोग नाहीं अशा रीतीनें शिकविली जाते.

अशा शिकण्यानें मुलें आपल्या विवक्षित व परंपरागत चालत आलेल्या धंद्यांत चांगलीं प्रवीण होतात व राहिलेला वेळ लिहिणें, वाचणें या सारख्या [illegible] गोष्टींत घालवीत

असल्यामुळें दुसरा असा फायदा होतो कीं त्यांचें लक्ष व्यसनाकडे फार कमी जातें व आपला धंदा मग तो कितीहि लहान किंवा मोठा असो, शक्य तितका सर्वांगसुंदर करण्याच्या युक्त्या त्यांना सुचतात. एकंदरींत तिकडील लोकांचें ध्येय ह्मटलें ह्मणजे उत्कृष्ट मनुष्य तयार करण्याकरितां मुलांचा मानसिक, शारीरिक व धार्मिक वगैरे बाबतींत उन्नति होऊन त्यांना असें वाटलें पाहिजे कीं, आपण आत्मप्रयत्नानें सर्व समाजाच्या उन्नतीस हातभार लावित आहोंत.

वरतीं वर्णन केलेल्या सुधारलेल्या देशांतील धंदे वगैरे सर्व शिक्षणाची पद्धती इकडे आमच्या सर्व तऱ्हेनें खालावलेल्या देशांत अमलांत आणण्याची पराकाष्ठा समाजधुरीणांनीं व देशहितचिंतकांनींच केली पाहिजे. ज्यांना गरिबीमुळें पुढें शिकतां येत नाहीं, पोटाची खळगी भरण्याकरितां नोकरी व तीहि कमी पगारावर पत्करावी लागते, अशांना जर धंदेशिक्षणाची गोडी व महत्व सांगून त्यास त्यांच्या ऐच्छिक विषयांत पारंगत केलें तर औद्योगिक बाबतींत व एकंदर समाज स्थितींतही चांगली इष्ट क्रांति घडून आल्या खेरीज राहणार नाहीं. अशा तऱ्हेनें मुलांना शिक्षणांत मदत करणें ह्मणजे मानवी जीवितांत अत्यंत महत्वाचें व उच्च दर्जाचें कार्य घडवून आणणें होय; ह्याच सर्वांत मोठा परोपकार; व ह्यांतच जन्माचें खरें सार्थक व ईश्वराचें भजन पूजन होय.

करितां आपल्याइतका कसून अभ्यास व कर्तव्य करणारा विरळा असें इतरांच्या नजरेस आणा. आपल्या वर्तनावर आपलीच देखरेख फार कडक ठेवा. खेळण्याचा आणि स्वच्छंद वर्तनाचा नाद कमी करा. विचारी व दूरदर्शी व्हा. आपले आप्तेष्टांवर, एवढेंच नव्हे तर मनुष्यमात्रावर ईश्वराचीं लेंकरें समजून प्रेम करा. एकंदरींत आपलें कर्तव्य आपण सर्व बाजूंनीं करून वर्तनक्रमहि असा रेखल्या सारखा व घड्याळाच्या कांट्या सारखा नियमित करा कीं, जणूं काय हीं बंधनें आपण स्वतःच्या बुद्धिनें, स्वतःच्या हिताकरितां लावून घेतलीं आहेत; त्यांत टंगळ मंगळ करूं नका.

आपण एखाद्या मोठ्या माणसाचें चरित्र वाचलें, अगर ऐकलें किंवा त्यांना पाहिलें ह्मणजे आपणास साहजिक वाटतें कीं, आपणहि त्यांच्या सारखें एक मोठें माणूस व्हावें. अशी इच्छा होणें स्वाभाविकच आहे, परंतु इच्छा उत्पन्न होणें जितकें सोपें आहे तितकेंच जर त्या लायकीची योग्यता मिळविणें सोपें असतें तर आपणापैकीं प्रत्येकानें

जागा केव्हांच पटकाविली असती. परंतु ती जागा नुसत्या इच्छेनें मिळत नसते. ती मिळविण्यास फार श्रम करावे लागतात. ते करण्याचा दृढनिश्चय किंवा मनोधैर्य आपणामध्यें नसतें; म्हणून आमची ती इच्छा जागच्याजागींच राहते. जे दीर्घोद्योगी असतात तेच पुढें जातात. तरी ती योग्यता मिळविण्याचा दृढनिश्चय प्राप्त होण्याकरितां व मानवी अंतःकरणांत वारंवार व निरनिराळ्या उठणाऱ्या मनोवृत्तींना योग्य वळण लागण्यास, सदसद्विवेकबुद्धि प्राप्त होण्याकरितां, आत्मसंयमनाची संवय लहानपणापासून विशेष ठेविल्यास कालांतरानें ती योग्यता आपणास प्राप्त होईलच होईल, आणि आपल्यामध्यें व आत्मसंयमनाची संवय नसणारांमध्यें किती स्थित्यंतर होतें याचीहि साक्ष पटेल.

अशा रीतीनें मला निरनिराळ्या प्रकारांनीं ते पुष्कळ उपदेश करीत असतात, त्यांतील कांहीं मला आठवत होता तो मी टांचून आणिला आहे व आपल्यापुढें ठेविला आहे. ह्या थोर व विद्वान् माणसाचा अनुभव असल्यामुळें अत्यंत ग्राह्य व लक्षांत ठेवण्यासारखा आहे; तो आईबापांनीं व शिक्षकांनीं योजिला असतां व मुलांनीं पाळला असतां अत्यंत श्रेयस्कर होईल.

सारांश—मित्र हो, प्रत्येकानें आपलें कर्तव्य करावें हेंच याचें तथ्य आहे. इतर प्राण्यांत व मनुष्यप्राण्यांत फरक ह्याच कीं, इतर प्राणी जसे परिस्थितीनें जखडले जातात तसें मनुष्याचें नाहीं, तो आपली परिस्थिती बदलूं शकतो व आपल्याला पाहिजे तशी निर्माण करूं शकतो. आपण आतां कांहीं लहान नाहीं, आपल्याला आपलें हिताहित कशांत आहे हें बरोबर समजलें पाहिजे. कोणी ह्मणतील कीं अनुभव घेऊं आणि मग तसे वागूं तर त्या ह्मणण्यांत कांहीं अर्थ नाहीं; हें ह्मणणें केवळ चुकवाचुकवी करण्याचें होय. प्रत्येक गोष्टींत आपण अनुभव घेऊं लागलों तर आमचें सर्व आयुष्यहि पुरणार नाहीं करितां थोर पुरुषांचीं चरित्रें ह्याच आपला अनुभव आणि आपलें कर्तव्य हेंच आपलें उच्च ध्येय असें समजून व तें नेहमीं आपल्या नजरे समोर ठेवून तें मिळविण्यास लागेल ती मेहनत करण्यांत कसूर करूं नका. आज नाहीं उद्यां खात्रीनें यशस्वी त्यांतहि

आपणांपैकीं बहुतेकांस अनुभव असेलच कीं, लहानपणीं ज्या त्यांचे दोष माणसें अभ्यासास बसवितात त्या वेळीं आपणास खेळण्याच

चुकवाचुकव करून ती वेळ मारून ण्याची आणि अभ्यासाची व्याद कशीना कशी फेंटाळून लावण्याची युक्ति हरतऱ्हेनें शोधून काढण्यांत आपण कसे तरवेज बनतों ? आणि इतकेंहि करून त्यांच्या धाकानें कदाचित थोडा वेळ बसावें लागलेंच तर पुस्तकाकडे डोळे असतात; परंतु सर्व लक्ष खेळाकडे असतें. वडील माणसांची जरा नजर आड झाल्यास खेळाकरितां चटदिशीं उडी मारितों हें खरें कीं खोटें व ह्याचें कारण काय हें लक्षांत आणा. आपणाला असें करण्यास कोणी शिकवितात काय ? उलट, वडील माणसें तर अभ्यास कर ह्मणून सांगतात; खेळ जा ह्मणून कधींच सांगत नाहींत. आपण अजाण असल्यामुळें आपलें खरें हित कशांत आहे याची आपणांस जाणीवच नसते व लहानपणीं स्वाभाविकच खेळाकडे प्रवृत्ति असल्यामुळें तेंच आपलें ध्येय व त्याच्यावरच निःसीम प्रेम असतें. परंतु तितकेंच जर आह्मी वेळाचें महत्त्व मानून व आत्मसंयमनाची संवय लावून अभ्यासाची कळकळ वाळगूं तर आमचा यशोदुंदुभी सर्वत्र पसरणार नाहीं काय ? खात्रीनें पसरेल. करितां दीर्घ प्रयत्नांनीं आणि सततोद्योगानें कर्तबगारी करून दाखवा. आपल्यांत खरी तळमळ आहे, खरी आस्था आहे, खरी निष्ठा आहे, दृढनिश्चय आहे व स्वार्थत्यागाची वुद्धि आहे याची साक्ष लोकांना पटवून व हे गुण आपल्या अंगीं आणून एकनिष्ठेनें कार्यसंपादन करणारास आज किती तरी गोष्टी करितां येतील हें प्रत्यक्ष अनुभवाला आणा.

अशा तऱ्हेचा अत्यंत जिव्हाळ्याचा, नित्य मननीय व प्रत्येक मनुष्याच्या आत्मिक सुधारणेस अधिकाधिक उत्तेजनकारक वोध ऐकणाऱ्या सर्वांनीं, त्यांनीं इतक्या लहान वयांत विषयाची मांडणी थोडक्यांत फार सुव्यवस्थित केलेली पाहून, विवेचन सुवोध आणि चित्ताकर्षक झालेलें ऐकून व भाषाहि गोड, सहजौघी, प्रसंगानुसार उत्कट कळकळीची साधलेली पाहून त्यांची फार वाहवा केली. त्यांचा आलस्य निर्भत्सना, व उद्योग महात्म्य प्रशंसा या संबंधाचा कटाक्ष सर्वांना फार ग्राह्य व कौतुकार्ह वाटला.

पुढें १८८४ सालीं ह्मणजे वयाच्या एकोणीसावींतच सर्व साधारण लौकिक विद्या ( [illegible] ) यांनीं पुरी केली. कॉलेजांत असतांना कै. प्रो. महादेवराव गोखले [illegible] विद्यार्जनाचे अंतिम ध्येयाबद्दल कायमचा ठसा त्यांचे कोवळे [illegible] पर्यंत वृद्धिंगतच होत गेला.

आपण एखाद्या म[illegible]
आप[illegible] साहजिक
अशी इच्छा होणें स्वा[illegible]
तितके [illegible] विद्या [illegible]

घरची स्थिती फारशी समाधानकारक असतांही एकोणिसाव्या वर्षींच जी स्वार्थ-त्यागाची दीक्षा त्यांनीं घेतली ती देहान्त होईपर्यंत कडकडीत पाळली. प्रथम पुण्याच्या न्यू इंग्लिश स्कुलांत शिक्षक राहिले; नंतर कॉलेजांत प्रोफेसर झाले, वर्गणी जमा करून फर्ग्युसन कॉलेजची इमारत उभारली, सर्व्हंटस् ऑफ इंन्डिया सोसायटी "... तभूचें सेवक मंडळ " ही संस्था स्थापिली, शाळा व कॉलेजाचा सर्व खटाटोप चालू असतांना पुण्याच्या सार्वजनिक सभेची चिटनिशीही यांस लाभली. गुरु येथेंच भेटले—कै०.माधवराव रानड्यांशीं संबंध जुळून आला. या चिटनिशी बरोबरच कांग्रेस सभेंत प्रवेश होऊन तेज चारी दिशांस फाकूं लागलें. सार्वजनिक सभेचो चिटनिशी संपते न संपते तोंच मुंबई कौन्सिलचें काम चोख बजावून हिंदुस्थानचे कौन्सिलांत प्रवेश झाला. तेथील विजय काय विचारतां ? प्रति-पक्षानें देखील प्रांजलपणें थोरवी गावी ! विलायतेंतील सफरी—आफ्रिकेंतील सफर—अशा-तऱ्हेनें आरंभापासून तों अखेरपर्यंत ज्या ज्या कामांत हात घातला त्यांत प्रतिपक्षास दोन हात दाखवून, यशाचा तुरा स्वशिरीं धारण करून, आपली यशोदुंदुभि चारी दिशांत गाजविली, त्या रथी महारथ्याचें यश एक मुखें काय वर्णावें ? आज कितीशा ...तरांत लेखण्या व वाक्पटु जिव्हा तें काम एक सारखें करीत आहेत. अशा तऱ्हेनें स्वजन परजनांकडून वाहवा मिळवून ज्या आत्म्यानें आपली इहयात्रा नुकतीच ( तारीख १९ फेब्रुवारी १९१५ रोजीं रात्रीं १० वाजतां ) संपविली तो खरोखर महात्माच होय ! यांनीं देह विसर्जन केला पण ' ईश्वरी देणगी, तुह्मां आह्मांसाठीं मागें ठेविली आहे. तें टोचकें आपण आतां सोडून आंत काय काय सांठवून ठेविलें आहे तें पाहूं याः—

हा पहा उद्योग, काय त्याची चिकाटी ! एक घडी उकलावी तों दुसरी खालीं तया-र्च. उदय, यामुळेंच खास झाला, त्या उद्योगापुढें सर्व कांहीं तुच्छ ! जो विषय हातीं घेतला त्याचा पिच्छा पुरवून पुरवून तो अगदीं हातचा मळ करून टाकिला. उद्योगा-बरोबरच सत्याची चाड ! जें योग्य दिसेल तें करावयाचें व बोलावयाचें पण त्यांतहि मधुरपणा भरलेला ! अंतःकरण इतरांच्या कळकळीनें भरलेलें असल्यामुळें त्यांचे दोष ...ले तरी तीं माणसें आपलींच होत ही खोल भावना ...स्था तर मूर्तिमंत येथें वासच करीत होती. कोणाचे जिव्हाग्रीं दे... कोणाकोणास देव देवळांत दिसतात; कित्येकांस सणावारीं देवा...

चुकवाचुकव करून ती वेळ मारून [illegible]ण्याची आणि अभ्यासाची व्याद कशीना कशी फेंटाळून लावण्याची युक्ति हरतऱ्हेनें [illegible]ोधून काढण्यांत आप[illegible] कसे तरबेज बनतों? आणि इतकेंहि करून त्यांच्या धाकामु[illegible] कदाचित थोडा वेळ बस[illegible] लागलेंच तर पुस्तकाकडे डोळे [illegible]असतात; परंतु सर्व लक्ष खेळाकडे असतें. [illegible]ल माणसांची जरा नजर आड झाल्यास खेळाकरितां चटदिशीं उडी मारितों हें खरें कीं खोटें व ह्याचें कारण काय हें लक्षांत आणा. आपणाला असें करण्यास कोणी शिकवितात काय? उलट, वडील माणसें तर अभ्यास कर ह्मणून सांगतात; खेळ जा ह्मणून कधींच सांगत नाहींत. आपण अजाण असल्यामुळें आपलें खरें हित कशांत आहे याची आपणांस जाणिवच नसते व लहानपणीं स्वाभाविकच खेळाकडे प्रवृत्ति असल्यामुळें तेंच आपलें ध्येय व त्याच्यावरच निःसीम प्रेम असतें. परंतु तितकेंच जर आह्मी खेळाचें महत्त्व मानून व आत्मसंयमनाची संवय लावून अभ्यासाची कळकळ बाळगूं तर आमचा यशोदुंदुभी सर्वत्र पसरणार नाहीं काय? खात्रीनें पसरेल. करितां दीर्घ प्रयत्नांनीं आणि सततोद्योगानें कर्तबगारी करून दाखवा. आपल्यांत खरी तळमळ आहे, खरी आस्था आहे, खरी निष्ठा आहे, दृढनिश्चय आहे व स्वार्थत्यागाची बुद्धि आहे याची साक्ष लोकांना पटवून व हे गुण आपल्या अंगीं आणून एकनिष्ठेनें कार्यसंपादन करणारास आज किती तरी गोष्टी करितां येतील हें प्रत्यक्ष अनुभवाला आणा.

अशा तऱ्हेचा अत्यंत जिव्हाळ्याचा, नित्य मननीय व प्रत्येक मनुष्याच्या आत्मिक सुधारणेस अधिकाधिक उत्तेजनकारक बोध ऐकणाऱ्या सर्वांनीं, त्यांनीं इतक्या लहान वयांत विषयाची मांडणी थोडक्यांत फार सुव्यवस्थित केलेली पाहून, विवेचन सुबोध आणि चित्ताकर्षक झालेलें ऐकून व भाषाहि गोड, सहजोधी, प्रसंगानुसार उत्कट कळकळीची साधलेली पाहून त्यांची फार वाहवा केली. त्यांचा आलस्य निर्भत्सना, व उद्योग महात्म्य प्रशंसा या संबंधाचा कटाक्ष सर्वांना फार ग्राह्य व कौतुकार्ह वाटला.

पुढें १८८४ सालीं ह्मणजे वयाच्या एकोणीसावींतच सर्व साधारण लौकिक विद्या ( [illegible] ) यांनीं पुरी केली. कॉलेजांत असतांना कै. प्रो. महादेवराव गोखले
आप[illegible] साहजिक [illegible] विद्यार्जनाचे अंतिम ध्येयाबद्दल कायमचा ठसा त्यांचे कोवळे
अशी इच्छा होणें स्वा[illegible] [illegible]र पर्यंत वृद्धिंगतच होत गेला.
तितके [illegible]अर [illegible]ंया [illegible]ले

घरची स्थिती फारशी समाधानकारक असतांही एकोणिसाव्या वर्षीच जी स्वार्थ-त्यागाची दीक्षा त्यांनीं घेतली ती देहान्त होईपर्यंत कडकडीत पाळली. प्रथम पुण्याच्या न्यू इंग्लिश स्कुलांत शिक्षक राहिले; नंतर कॉलेजांत प्रोफेसर झाले, वर्गणी जमा करून फर्ग्युसन कॉलेजची इमारत उभारली, सर्व्हंटस् ऑफ इंन्डिया सोसायटी "भारतभूचें सेवक मंडळ" ही संस्था स्थापिली, शाळा व कॉलेजाचा सर्व खटाटोप चालू असतांना पुण्याच्या सार्वजनिक सभेची चिटनिशीही यांस लाभली. गुरु येथेंच भेटले—कै०.माधवराव रानड्यांशीं संबंध जुळून आला. या चिटनिशी बरोबरच कांग्रेस सभेंत प्रवेश होऊन तेज चारी दिशांस फाकूं लागलें. सार्वजनिक सभेची चिटनिशी संपते न संपते तोंच मुंबई कौन्सिलचें काम चोख बजावून हिंदुस्थानचे कौन्सिलांत प्रवेश झाला. तेथील विजय काय विचारतां ? प्रतिपक्षानें देखील प्रांजलपणें थोरवी गावी ! विलायतेंतील सफरी—आफ्रिकेंतील सफर—अशातऱ्हेनें आरंभापासून तों अखेरपर्यंत ज्या ज्या कामांत हात घातला त्यांत प्रतिपक्षास दोन हात दाखवून, यशाचा तुरा स्वशिरीं धारण करून, आपली यशोदुंदुभि चारी दिशांत गाजविली, त्या रथी महारथ्याचें यश एक मुखें काय वर्णावें ? आज कितीशा तरी लेखण्या व वाक्पटु जिव्हा तें काम एक सारखें करीत आहेत. अशा तऱ्हेनें स्वजन परजनांकडून वाहवा मिळवून ज्या आत्म्यानें आपली इहयात्रा नुकतीच ( तारीख १९ फेब्रुवारी १९१५ रोजीं रात्रीं १० वाजतां ) संपविली तो खरोखर महात्माच होय ! त्यांनीं देह विसर्जन केला पण ' ईश्वरी देणगी, तुह्मां आह्मांसाठीं मागें ठेविली आहे. तें बोचकें आपण आतां सोडून आंत काय काय सांठवून ठेविलें आहे तें पाहूं याः—

हा पहा उद्योग, काय त्याची चिकाटी ! एक घडी उकलावी तों दुसरी खालीं तयारच. उदय, यामुळेंच खास झाला, त्या उद्योगापुढें सर्व कांहीं तुच्छ ! जो विषय हातीं घेतला त्याचा पिच्छा पुरवून पुरवून तो अगदीं हातचा मळ करून टाकिला. उद्योगाबरोबरच सत्याची चाड ! जें योग्य दिसेल तें करावयाचें व बोलावयाचें पण त्यांतहि मधुरपणा भरलेला ! अंतःकरण इतरांच्या कळकळीनें भरलेलें असल्यामुळें त्यांचे दोष …ले तरी तीं माणसें आपलींच होत ही खोल भावना …स्था तर मूर्तिमंत येथें वासच करीत होती. कोणाचे जिव्हाग्रीं दे… कोणाकोणास देव देवळांत दिसतात; कित्येकांस सणावारीं देवाचें

सर्वत्रांस संकट समयीं स्मरण होतें त्यानीं, तर स्वदेश व स्वबांधव हींच देवाचें [illegible] स्वरूप समजून आपला देह व आपलें सर्वस्व वाहिलें; स्वतः जिव्हेनें वाचालता न करितां, बाह्यात्कारीं प्रदर्शन न करितां, आजन्म सर्व क्रिया—कायिक, वाचिक, मानसिक—स्वल्पकालांत [illegible]पपणें—परमेश्वरास स्मरून केल्या व त्याचेच चरणीं ज्यानें त्या समर्पण केल्या तो या कालाचा एक कर्मयोगी संतच नाहीं बरें ?

साधेपणा, सात्विक वृत्ति, उद्योगाची चिकाटी, सत्याची चाड, परमेश्वरावर पूर्णभाव व भविष्यत्कालाविषयीं सदाशा इत्यादि अनेक स्पृहणीय गुणांनीं मंडित अशा कैलासवासी ना० गोपाळराव कृष्ण गोखले, सी. आय. ई. यांचें स्मरण आह्मांस सदैव घडावें, त्यांचें उदाहरण डोळ्यांपुढें राहावें, त्याचे चरित्रानें आह्मांस स्फूर्ति चढवी या इच्छेनें हा माझा अल्प प्रयत्न मी त्यांचे चरणीं समर्पण करितों.

ॐतत्सत्.

REFBK-0001269

[illegible] साहजिक [illegible]
अशी इच्छा होणें स्वा[illegible]
तितके [illegible]